UNIVERSAL
LIBRARY
OU_192458
UNIVERSAL
LIBRARY

कला-विकास-मंडळ.

प्रथम प्रकाशन

# सवंगडी

[ विद्यार्थी-जीवनांतील-गुजगोष्टी ]

लेखक :— ग. ना. वैद्य.

मे १९४१ ]

[ किंमत ८ आणे.

प्रकाशक—

सी. कृ. जोशीराव बी. ए.

कला-विकास-मंडळ,
इंदूर

सर्व हक्क मंडळाचे स्वाधीन

मुद्रक—

प. वि. जोशी.

श्री सोमेश्वर मुद्रणालय अमरावती.

# सवंगड्याची शीळ—

“ सवगडा ” ह्या पुस्तकाचे हस्तलिखित वाचण्यासाठी मजकडे देताना मडळाकडून पुस्तक प्रकाशनातील जो उद्देश सागितला तोच मला नवासा वाटला, व हस्तलिखित वाचल्यावर तो उद्देश बहुतांशाने सिद्धीस गेला असल्याचे दिसून आले मुलाच्या १८ वर्षे पर्यंतच्या वयाचे तीन विभाग केल्यास त्यातील पहिली सहा वर्षे बहुधा ‘ श्रीगणेशाय म ’ मध्येच जातात पुढल्या सहा वर्षांसाठी बालवाङ्मय शिशुगीते, बालकथा इ निरनिराळ्या नावानी लेखन-प्रकाशात आहे तसेच १८ वर्षे ओलाडल्यावर ह्मणजे तारूण्याच्या उंबरठ्या-आत प्रवेश केल्यावर ज्यात विशेष गोडी वाटते त्या प्रेम वाङ्मयाचा बाजार तर नित्य नव्याने उतास जात आहे ह्मटले तरी चालेल पण बारा ते अठरा या ह्मणजे धड लहान ना धड मोठे अशा वयात वाचायला योग्य व त्याच वयातील अर्ध-विकसित आशा आकांक्षा व भावभावना यथातथ्य चित्रिलेले लेखन फार कमी पहाण्यात येते “ शामची आई ” ह्या साने गुरुजींच्या पुस्तकातील वातावरण ज्या वयाच्या मुलांसाठी निर्माण केले आहे सरासरा त्याच वयाच्या मुलांसाठी ‘ सवंगडी ’ हे पुस्तक प्रसिद्ध होत आहे येवढे सांगितले ह्मणजे लेखकाचा व प्रकाशकाचा हेतु स्पष्ट होतो असे मला वाटते

“ सवंगडी ” मधील लेखांत विविधता असून त्यांत निरनिराळ्या रसांचा, भाव भावनांचा, आशा आकांक्षांचा व स्वभावांचा वयानुरूप योग्य परिपोष झालेला दिसेल व त्याबरोबरच करमणुकीच्या रूपाने सहज ज्ञान देण्याची लेखकाची हातोटीहि अनुभवास येईल

“ आधुनिक मुलाखती ” या लेखात विमान, वीज, रेडिओ, ग्रामोफोन ही सर्व मंडळी आपले स्वभाव व चरित्र स्वत च सांगताना पाहून कोणत्या

मुलाला मौज वाटणार नाही ? " कॅमेऱ्याला बळी " व " जुन्या बाजारातील गोड मेवा " या विनोदपूर्ण गोष्टी हूड विद्यार्थी वयाच्या सुरेख आठवणी कोणाहि समोर उभ्या करतील त्यातल्यात्यात उडाणटप्पू विद्यार्थीहि डायरी ठेवतो ही गोष्ट गृहीत धरल्यास जुन्या बाजारातील मेवा मजेदार आहे " विधिलिखित व आगपेट्या विकणारी गरीब पोर " या गोष्टी करूणरसपूर्ण व विद्यार्थी वयातल्या भावनासुलभ मनाची पकड घेणाऱ्या आहेत त्यातील दुसरी गोष्ट जुन्या रॉयल रीडर मधील " Match Girl " ह्या गोष्टीचे रुपांतर असूनहि ती चांगली वठली आहे " खरा यशवन्त " ही गोष्ट थोडी मोठी पण शाळेचे खेळाडू वातावरण हुबेहूब निर्माण करणारी व विद्यार्थी वयातील स्वाभाविक उच्च मनोवृत्तींना पोषक अशी सरस साधली आहे

हा लहानसा " सवंगडी " तरूणांना व प्रौढांना मनोरंजक होईल, कारण त्यात रंगविलेली चित्रें सर्वांच्या परिचयाचीच आहेत पण बारा ते अठरा या मध्यम विद्यार्थी वयातील सवंगड्यांची हा ' सवंगडी ' गोड करमणूक करूं शकेल असा विश्वास वाटतो या अर्धविकसित वयात मन व बुद्धीहि तशीच असतात त्यामुळे यावेळी अशा मुलास योग्य संगत मिळावी अशीच आईबाप किंवा शिक्षक अपेक्षा करीत असतात **त्यांना अशा प्रकारचे सवंगडी फार आवडतील घरी-दारीं, शाळेत मैदानावर, मुलांबरोबर खरी खुरी दोस्ती करणारे, त्यांच्या आशा आकांक्षांना स्फूर्ती देणारे व भाव भावना जगवणारे, आणि यशापयशांत योग्य प्रोत्साहन किंवा शाबासकी देणारे त्यांचे समवयस्क सवंगडीच असतात. हा ' सवंगडी ' हि त्यांच्यांतलाच एक आहे असें—** विद्यार्थ्याला वाटले, निदान थोड्या वेळासाठी का होईना जरी या सवंगड्यानें मुलाला शाळेच्या म्हणजे करमणुकीच्या वातावरणाबरोबरच ज्ञानार्जनाच्या वातावरणात नेऊन सोडलें तरी तो खरा ' यशवन्त ' झाला असे लेखकास वाटेल.

**—वि. ह. आपटे**

## तुह्मी काय वाचाल ?

| | | | |
|---|---|---|---|
| १ | विमान | [ आधुनिक मुलाखती ] | २ |
| २ | वीज | ,, ,, | ७ |
| ३ | ग्रामोफोन | ,, ,, | १२ |
| ४ | नभोवाणी | ,, ,, | १७ |
| ५ | कमेऱ्याला बळी | | २३ |
| ६ | खरा यशवंत. | .. | ३५ |
| ७ | आगपेट्या विकणारी गरीब पोर | | ६४ |
| ८ | विधिलिखित | | ७१ |
| ९ | जुन्या बाजारांतील गोड मेवा | | ८१ |

# सवंगडी

कला-विकास-मंडळ,
इंदूर

— 0 —


● सी. कृ. जोशीराव.
बी. अ

● ग. ना. वैद्य.

● ग. कृ जोशीराव.
जी. डी. आर्ट.

# हद्गत !

**प्रिय वाचक!**

"सवगडी" प्रकाशित करताना कसल्यातरी अज्ञात हुरहुरीने मन काही काल भाबावून जात प्रतिभाशाली साहित्यरत्नाच्या चमत्कृतीपूर्ण नवकल्पनानी बहरणाऱ्या वाङ्मय-वाटिकेत पहिले पाऊल टाकताना मनाचा गोंधळ उडाल्यास कसचे नवल?

विशाल गगनात स्वैर भराऱ्या मारणाऱ्या विहगराजाच्या सामर्थ्याने दिपून चिमुकलें फुलपाखरु का पख पसरण सोडून देत? जिवत जीवनाचा उपभोग घेताना होणारा आनद व विकासाचा ध्रुव गाठताना होणारे सात्विक, शात समाधान मिळविण्याकरिताच तर जगाची धडपड चाल-लेली असते मग त्या ठिकाणी गरीब-श्रीमत लहान-थोर हा भेदच मुळी उरत नाहीं

श्रीमंत साहित्य सम्राटाचा वैभवशाली पाहुणचार घेताना आपल्या सारखे रसिक व प्रेमळ वाचक गरिबाने आदरानें पुढे केलेल्या मीठ-भाकरीचा अव्हेर तर करणार नाहीना?

विद्यार्जनाकरिता दूरदूरच्या ठिकाणाहून अनेक युवक शिक्षण केंद्र असलेल्या शहरात येतात सानिध्याने, सहवासाने व विशेष स्वभावधर्मा-मुळें स्नेहसंबंध जुळून येतात अशाच एका मैत्रीला चिरस्थाई स्वरुप देण्याकरिता कला-विकास-मंडळ, ही शारदा व कला याची उपासनास्वरुप

सहकार्यानें साधलेली सस्था जन्म पावली आहे, इतकेच आजच्या घटकेला सागितलेलें पुरेसें आहे

ही प्रथम कृति १२ ते १८ वर्षांच्या नवयुवकाच्या सेवेला वाहिलेली आहे ज्या प्रमाणात त्याच्या अपेक्षा पूर्ण होतील त्या मानाने लेखकाचा व मडळाचा या विशिष्ट प्रकाशनाबद्दल असलेला हेतू पूर्ण होईल श्री रा रा वि ह आपटे यानी प्रस्तावनेत स्पष्ट खुलासा केला असल्यामुळे मर्मज्ञ वाचकाचे समाधान होईल अशी आशा आहे

श्री वि ह आपटे, माजी चिटणीस महाराष्ट्र सभा, इदूर, व "मालव साहित्य" या त्रैमासिकाचे भूतपूर्व सपादक, तसेच "माला" या काव्य संग्रहाचे कर्ते आणि 'समाजातील साप" व 'गुडघ्याला बाशिंग' या अप्रकाशीत नाटकाचे लेखक यानी आपला अमूल्य वेळ खर्च करुन अत्यत जिव्हाळ्याने सारे हस्तलिखित वाचले, वेळोवेळी सूचनाहि केल्यात व प्रस्तावनेदाखल चार शब्द आपलेपणाने लिहिले याबद्दल मडळ सदैव त्याचे ऋणि राहील श्री सी ना गवारीकर, 'मराठी साहित्य समालोचन' या ग्रथाचे सहाय्यक याचाहि मोठ्या आदराने उल्लेख करावासा वाटतो

मंडळाच्या अत्यत निकट परिचयाचे चित्रकार श्री एम् एस् जोशी यानीं कथा-चित्र तयार करुन देण्यात जो तत्परता दाखविली त्याबद्दल मंडळ त्याचे अत्यत आभारी आहे श्री ना दे अमिन, बी ए यानी स्वयस्फूर्तीने पुढें येऊन मुद्रण चालू असताना केलेली बहुमोल मदत मडळाच्या स्मरणात नेहमीच राहील पुस्तकाच्या सुबक छपाईचे व सजावटीचे श्रेय श्री सोमेश्वर मुद्रणालयाचे मालक श्री. पां व्हा जोशी याचेकडेच आहे, व ते मडळावर पुढेंहि असाच लोभ ठेवतील

प्रकाशक

—सी. कृ. जोशीराव.

# आधुनिक मुलाखती

कालचं जग आज नाही, कां ?
तर त्यात नित्य नवे नवे शोध चमत्कार निर्मितात.
पण ते सारे का नि कसे निर्माण झाले हे पहात बसण्यापेक्षां
आपल्या प्रतापानं आज
जगाला ते कसे खेळवीत आहेत
हे पहाणें अधिक श्रेयस्कर होईल;
नाही कां ?
त्यांतूनहि ते सारं त्याच्याच शद्बांत ऐकायला सांपडलं तर
किती बहार होईल !
मग हे पहा,
त्यापैकी आले आहेत कांही आपली भेट करून द्यायला तुह्मांला;
मग अंमळ येतां कां इकडे ?—

# आधुनिक मुलाखती

## १. विमान

कोण तें माझं वैभवशाली जीवन !
पण आता ! नको हे जिणं !

मनुष्यानं जमिनीवर राज्य केलं, पाण्यात किल्ले बांधिले, दीप-स्तंभ उभारिले, बागबगीचे लाविले; आणि जमिनीप्रमाणं पाण्यावरहि तरती सृष्टी निर्माण केली.

पण वर आकाशाकडं डोळे लागले की क्षणभर मनाला खेद वाटे. उंच उडणाऱ्या पक्षाच्या जीवनाचा मत्सर वाटू लागे, वरून खालचं जग कसं दिसेल, हवेंत काय काय चमत्कार असतील; कापसासारख्या ढगाच्या पुंजक्यातून इकडून तिकडे उडताना कसं पण मजेदार वाटेल; अन् त्याहिपेक्षा खूप उंच अन् अफाट पसरलेल्या स्वर्गाची कल्पना असणाऱ्या नीलाकाशांत विविध, तेजस्वी तारका, गोलाचं राज्य कसं असेल; ह्या साऱ्या साऱ्याबद्दलच कुतुहल त्याला स्वस्थ बसू देईना.

—ते ह्मणे, "वेड्या, अरे ऊठ, पक्षासारखी वर आकाशभर उंच भरारी मार, अन् निळ्या नंदनवनातील शोभा मनमुराद लूट. पहा, ते पक्षी कसे उंच उडतात, खूप उंच उडतात, का, तर ह्मणे त्याना पख!"

"पख" हा शद्ब ऐकून कोण आनंद झाला त्याला! अन् खरच, असे पंख आपणहि लाविले तर?

केलं तस त्यान.

लाविलेत पंख.

पण उंच उडणाऱ्या घारीसारखे का ते अंगचे?

डोंबकावळ्याच्या पिसासारखे उसने!

मग त्यात तितका जोर रहावा कसा नि किती? ते तेव्हाच गळून पडत.

पण मानवाला परमेश्वरान बुद्धि दिली साऱ्या मुलखगिरीतील!

वर जाण्याची हौस तेवढ्यानच का जिरावी!

मग ज्या हवेत तरंगायच तिलाच कोंडली कागदातून, कापडातून, त्याच्या बंद छत्र्यातून

पण व्यर्थ!

बुगासारखा बेछूट, जाऱ्याच आकाशाकडे धाव घेणारा धूरहि भरून पाहिला, पण तो मूळचाच स्वैर! वाटेल त्यावेळी निघून जाई; वाऱ्याच्या झोताबरोबर छत्रीच्या चिंध्या होत, आणि हवेत किल्ले बांधण्याकरिता वर तरंगणारा कोठे तरी आदळून त्याचा कपाळमोक्ष होऊन जाई.

असे कित्येक कपाळमोक्ष झाले. पण एकदा कमाला लाविलेली तीव्र इच्छा आणि मनाचा बेगुमार निर्धार काही कमी पडेना.

मानवी प्रयत्न आणि मृत्यू याची जणु झटापटच होती ती!

शेवटीं अस होता होता काय चमत्कार झाला कुणास ठाऊक; एके दिवशीं माझा अचानक जन्म झाला—कुणी ह्मणतो इंग्लंड बेटातल्या एका दूरच्या कोपऱ्यात झाला, कुणी ह्मणतो अन्–किती तरी ह्मणतात तेव्हा जन्मस्थान कोणतं ते राहू द्या अमळ बाजूला. त्यावेळी मला कोण आनंद झाला! वायुपुत्राप्रमाण जन्मताच मीं एकदम वर उड्डाण मारली, मनाला एकट वाटू नये, त्याला धीर रहावा ह्मणून तुमच्यातलाच कोणीसा एक महान शास्त्रज्ञ (७००–८०० वर्षापूर्वीची गोष्ट, मग नक्की कस आठवणार!)-बरोबर घेतला.

प्रत्येक क्षणीं मी वर वर जाऊं लागलो.

आतांपावेतो मोठ्या दिमाखानें धावपळ करणाऱ्या जमिनीवरील मोटारी, आगगाड्या मुंग्याप्रमाण मला तुच्छ वाटू लागल्या. खळखळणाऱ्या पाण्यातून वायुगतीन सू सू करीत पाणी कापीत जाणाऱ्या बोटीहि बिचाऱ्या निर्जीव, गतिहीन वाटू लागल्या

ढगातून भरधाव धावताना मला कोण दिमाख वाटू लागला. वर पहाव तो साऱ्या निळ्या आकाशात मीच राजा, खालीं पहाव तो येथून तेथून सारंच मुंगीच्या वारुळासारख. मधून मधून चमकणारे पाण्याचे मोठाले जलाशय देखील ओंजळीत घोट घेण्यासारखे; मोठमोठीं झाडें, वृक्ष, इमारती–सारीच इवलींशी!

माझं सुंदर रूप, मधुर नाद, पक्षामारखी उच्च झेप, वाऱ्या-सारखी बेफाम गति पहावयाला जमिनीवर मानव प्राण्याचे, येवढच नव्हे तर भयसूचक पशुपक्षाचे थवेच्या थवे मुग्धाप्रमाणं आ वासून माझ्याकडे पहाताना माझा दिमाख सारखा वाढू लागला मूळच्या मधुर संगीत ध्वनींतून घरघर होऊ लागली. गति अधिकच बेफाम झाली. पण असा दिमाख कोठवर चालणार !

असं हे कित्येक वेळा झाल.

एकदा असाच मी वर बेछूटपणे धावत होतो. मला कशा-चच भान नव्हत. शेवटी माझे पाय थकले. मला भोवळ आल्या-सारख झाल अन् मग मी हवेत गटंगळया खाऊ लागलो माझा सारथी देखील घाबरून गेला

दुसऱ्याच क्षणी त्याच्यासह मी धाडकन् जमिनीवर आदळलो माझ्या चैनीकरिता मी त्याचाहि बळी घेतला !

बिचारा तो मेला ! पण मी मात्र त्या छिन्न-विछिन्न स्थिती-तूनहि आजतागायत अमर ठरलो !

त्यानंतर माझ्यात कित्येक रूपांतर झाली. रंगारुपात, बाह्य—आंतर—स्वरूपात केवढातरी फरक पडला. इतका कीं माझ अत्यंत नाजूक शरीर जाऊन क्वचित् पोलादी, मोठाले घाव घातले तरी सहसा दाद देणार नाहीं असली अंगकाठी घडून आली.

लवकरच मोठ्या अवाढव्य स्वरूपाचा, डौलदार अन तीरा सारखा चपळ म्हणून जगात माझी मानमान्यता होऊ लागली. मोठमोठाल्या राजेरजवाड्याजवळ मी सुखानं, आनंदानं नांदू लागलो. एकाचं इंगित दुसऱ्यास सांगण्यास मी तीराच्या गतीनं डोंगर, पहाड

महासागरहि उल्लघूं लागलो, अन् हळू हळू माझ्यात लष्करी बाणाहि डोकावूंच नव्हे तर खेळूंहि पण लागला

माझ्या अशा वैभवशाली जीवनाकडे मग साऱ्या जगाचे डोळे लागले.

पण माझ्या ह्या सुधारणेकरिता, वैभवाकरिता, मानव जातीच किती रक्त साडलं ! पैशाचे अन् अकलेचे किती पूर वाहिले ! माझ्या सौभाग्याकरिता स्वार्थत्यागाची, ही अतुल धाडसाची कामगिरी आज मी माझ्या जीवन चरित्रात सुवर्णाक्षरात लिहिण्यास बसलों आहे. पण पण माझ्या अगाचा हा असा संताप का बरं होत आहे ? सार शरीर का बर थरथरत आहे ? डोळयातून अश्रूंचे पूर का बर ओसडत आहेत ?

माझ्या अतुल वैभवामुळे आजवर मी साऱ्या जगाला दिपवल ना ! मग मला अस का बरं वाटत आहे ?

हाय ! माझ सार वैभव, माझी सारी संपत्ति, माझा सारा मोठेपणा आज व्यर्थ ठरावा !!

ही सुधारणा नसून महाभयंकर आपत्तीच ओढून आली !!!

ज्या माझ्यामुळ जगाची संपत्ति वाढली, शोभा वाढली, सुख वाढलं, ( असा माझा समज. )—तोच मी आज त्यातील मानवजीवाचा विध्वंस शेकड्यानींच नव्हे, हजारानीं—नव्हे, लाखानीं करून गोतासच काळ ठरत आहे !

माझ वैभव, माझा पराक्रम जगाचा उद्धार करणार हे पाहून पोटांत न मावणाऱ्या आनंदात क्षणभर मिटलेले हे माझे डोळे आज माझ्यामुळं साऱ्या जगाचा विध्वंस होताना पाहून मी ते कायमचेच मिटून घेऊं का आता !!!

# २. वीज

**मी कांही उगीच माझी प्रौढी सांगत नाही,**
**पण आज जगांतून विलक्षण संचार करणारी मी,**
**थोडं आणखी थांबा, लवकरच साऱ्या, साऱ्या—**
**पृथ्वीमात्राच्या रोमरोमातूनहि हिंडेन —!**

**कां** कशी आहे मजा !

तुह्मी नुसता स्विच् दाबला नि मी खोलीभर लखलखून पसरले.

जणु ह्या चार भिंतीत रात्र ही कधीच अस्तित्वात नसायची.

दुनियेतील सारी संपत्ति आणून खच्चून भरली ह्या खोलीत तुह्मी, तरी कानेकोपरे रहातीलच कीं कोरे; पण माझं तसं नाही.

मी क्षणात सर्वव्यापी !

पण हे सारं तुह्मा मानवाच्या बुद्धीच्या, श्रमाच्या चमत्काराचं फळ आहे असं ह्मणतात. पण मी जो हा बंदिवास पत्करला आहे ना, तो तुमच्या बुद्धीच्या जोरावर ह्मणा पाहिजे तर, पण तो मी माझ्या इच्छेचा समजते. जगात महाभयकर स्वरूपात एकलकोंडे-

पणान रहाण्यापेक्षा साऱ्या जगाला सुखात ठेवण्याकरिता थोडा अधिक बदिवास पतकरण मला बर वाटत, येवढच.

पण जाऊ द्या, थोड बसा त्या समोरच्या खुर्चीवर, मी घालते ह्या ' फॅन 'चा वारा तुह्माला, अमळ थड वाटेल, कस सारखं उक-डतंय. आणि कटाळाच आला असला तर सागा–कुठल गाण ह्मणू ?

' मुबई ', ' दिल्ली ', की त्याहिपलीकडल — ' लडन ', ' अमेरिकेतल ? ' जिथे जस चाललय तस्स अगदी ? काय नको ? मग माझी ओळख का करून घ्यायला आलात तुह्मी ? ठीक, ठीक.

हे पहा, मी देखील सागेन सार आनदान तुह्माला.

माझ खरं खरं स्वरूप पहायच असल तर थोड दूरच रहावं लागेल तुह्माला. मी तरी काय करू ! माझा देहस्वभावच पडला असा.

अगदी पूर्वी मी मोकाट होते, मानव जातीन किती चुचकारल मला. पण माझ्या अत्यत स्वाभिमानी वृत्तीला ते पटेना जगात अत्यत सामर्थ्यशाली पराक्रमी जीवास एकदम दुसऱ्याच दास्यत्व पतकरण कधी आवडेल का ? मी जरा उग्र रूप दाखदिलं की बिचारे धक्क्यानच गतप्राण होतात. माझ्या अशा महा भयकर देहस्वभावाला कितीक बळी पडावयाचे होते कुणास ठाऊक !

सुमारे दोन शतकापूर्वीची गोष्ट.

' फॅरडे ' नावाचा एक शास्त्रज्ञाचा राजा मजकडे आला. त्याचं ते गभीर सौदर्य, हस्त लाघव, अन् विशाल बुद्धिमत्ता, ह्यावर मात्र मी भाळले, अन् बस् तोच दिवस माझ्या जीवनांत क्रान्ति-

कारक ठरला मग हव तर मानवी सौंदर्यान, बुद्धिमत्तेन मला जिंकल म्हणा, नाही तर तो माझ्या खुशीचा सोदा होता म्हणून म्हणा, जगाचा वदिवास पतकरायला मी भाग झाले, येवढ खर.

जगात जितक माझ रूप तेजस्वी, जितक अस्तित्व विशाल, तितकीच जातीनहि मी महाभयकर ठरले आहे. जणु विधात्या 'फॅरॅड' न मला जवळ केल अन् मला साऱ्या जगभर सोडून देऊन माझ्या पराक्रमाला वाव दिला तो माझ्या ह्या काळरूपी महा-भयकर देह स्वभावामुळच.

माझ्यापुढ कोणीहि याव, कसहि याव, त्याची मात्रा म्हणून चालावयाचीच नाही जगात तुम्हाला हा जो माझा वदिवार, सुसघटित चमत्काराने भरलेला दिसतो ना, तो माझ्या वदिस्त, मर्यादित, स्थिती-मुळच मला जर का मोकळ सोडल तर मी रानोमाळ शिरेन, जगभर उसळेन, अन् मग सारच काही अघटित होईल ! मला हे सार समजत, नि क्षणभर वाटत लवचीक, जरा नरम व्हाव, इतका कडकपणा, आडदाडपणा स्त्री जातीला शोभत नाही पण जगाच्या आजच्या वैभवाकडे अन् सुखसमाधानाकडे पाहिल म्हणजे वाटायला लागत, आपण जर का मवाळ झालो, जातीन शालीन झालो, तर ही सारी अवर्णनीय शोभा राहील का कुठ तरी ?

आणि दुसर, सार जग चळचळ कापतय आपल्या ह्या प्रख-रतेला, पराक्रमाला आज तेंच नाहीस झाल म्हणजे जीवनच संपल सारं !

जिला तुह्मी 'वीज' ह्मणता, 'विद्युलता' ह्मणता, ती एकीकडे आपल्या प्रचड सामर्थ्याने असख्य विशाल चक्र फिरवून साऱ्या जगाला तेजाच्या प्रखर वातावरणात खेळविते, आपल्या अफाट सामर्थ्यान अहोरात्र हालचाल करवून विविध स्वरूपाचे कारखान, घरेदारे, नयनमनोहर बागबगीचे, मधुर सगीते निर्माण करून जगाच्या प्रत्येक कानाकोपऱ्यातन जिवतपणा निर्माण करते.

तीच दुसरीकडे आजच्या अद्यावत् ( Up-to-date ) जगात अगदी मवाळपणे तुमच्या केसावरून हळुवारपणे हात फिरवून मग दाढीलाहि हळूच हात घालताना ( Electric Shaving ) पाहून तुह्मी तिला कठोर, बडखोर आडदाडच म्हणणार काय ?

बाबानो, ही जातीची विद्युल्लता बाह्यात्कारी कठोर भासली, अतरंगात जाज्वल्य असली तरी मेणासारखी मऊ पाडायला, प्रेमळ दासीसारखी राबवावयाला, हिच्यावर तुमची सत्ता चालताना ती मुळीच काकू करणार नाही बर !

मला वाईट वाटत ते हेच की जो येतो तो माझ्या तेजस्वी सौदर्यावर तेव्हाच मोहून जातो; पण दुसऱ्याच क्षणी एकदा का त्याला कळल की ही सुदरता, हे तेज अत्यंत उग्र आहे, निमिषात भस्म करणारं आहे, ह्मणजे तो नाक मुरडून जातो दूर निघून.

. पण बिचारा गरीब प्राणी ! त्याला हे काय माहीत की माझा आज कोण पसारा पसरला आहे चोहीकडे. प्रतिक्षणी मी मोठमोठ्या शास्त्रज्ञाच्या डोक्यात प्रचंड खळबळ माजवून विलक्षण

घडामोडीच्या नित्य नव्या गोष्टी करीत असते कालच जग आज नाहीं; आजचं उद्या नाही, उद्याच परवा नाही, अन् मोठ्या अभिमानान सांगावस वाटत मला की येथील प्रत्येक जीव मात्राच्या जीवनात लवकरच एक क्षण येणार आहे की माझ्यावाचून त्याना तिळमात्रहि चैन पडायच नाहीं !!

आधुनिक मुलाखती—

# ३. ग्रामोफोन

इतके दिवस तुम्हाला खूप हंसवलं, खेळवलं,
पण आतां —
“ आते का बोल बाला, जाते का ”
— आतां शहर गेलं, खेडं आलं – म्हणाना !

माझं नाव ग्रामोफोन एडीसन.

जगांत अत्यंत चमत्कारिक कुळकथा असणाऱ्या वस्तुमात्रा-पैकींच मी एक. ते सारंच सांगायच म्हटलं तर जे सांगायचं ते तर राहील बाजूला अन् वेळ जायचा निघून. कारण मी जें काही सांगणार ते अवघ्या तीनच मिनिटांत. व्यासपीठावर उभं राहून “ दोनच मिनिटांत संपवितो, ” म्हणून दोन दोन तास चऱ्हाट लांबवाव्याची मला मुळीच कशी ती खोड नाहीं. असो.

मी नेहमीच बोलका असलो तरी माझी वृत्ती मात्र तशी नव्हे. कोणी बोललाच तर मी बोलतो, म्हणजे – वाटतं ते नव्हे तर ऐकलं तेच; अगदी तस्सच. वाटलं तर त्याला तुमच्या भाषेत ‘ पोपटपंची ’ म्हटलं तरी चालेल. मला राग नाहीं यायचा. हो,

जिथं वृत्ती, स्वभाव, धर्म अन् पुटे धंदाच पडला असला, तिथं राग करून करायचा किती ?

पूर्वी एखादे वेळीं मला देखील वाटे हे सारं जीवन निरर्थकच करावी मनमुराद बडबड, अगदी मनात येईल तशी पाहिजे कशाला दुसऱ्याच बधन ? पण वयाची पाऊणशे वर्षे काढल्यावर ही उप-रती काय कामाची ! आल तेच पुढ सरकवल पाहिजे, जास्त विचार नको मनात. मात्र कधी कधीं माझ सार आयुष्याचित्र माझ्या-पुढं उभ रहात स्वभाव अन् वृत्तीप्रमाण धदा करायच ठरविल त्याला मोठ्ठ कारण ह्मणजे माझी तल्लख बुद्धिमत्ता मी जन्मताच अगदी एकपाठी कोठेहि ऐकण्यात आलेल्या किरकोळ उचक्या, शिंका, ठसके देखील अचूक टिपलेले. अगदी आरशात रूप पाहाव लागत ना, तस्सच जे काही तुमच तुह्माला ऐकायच असेल ते आधी माझ्या कानावर घालाव लागत.

दर्पण नीतिमुळ कधी कधी तुह्मी ज्याचे वंशज आहात त्याची आठवण, चेहऱ्याची कसरत करवून सहज करून घेता, तस्संच माझ्या मुळहि कधीं कधी तुह्माला आपण गायनात सगीतज्ञ गर्धभाचार्यांचेहि वशज आहोत ही जाणीव ओझरती तरी करून घेता येईल. पण त्याच सार श्रेय मात्र तुमच तुह्मालाच तुह्माला त्या करिता कमी का त्रास पडतो ? हसण्या ऐवजी किंकाळ्या माराव्या लागतात; भेसुर तानाची भेडोळीं एका मागून एक सोडावीं लागतात, खादे उडवून, ठसके देऊन, सारं अग घुसळून पवित्र्यावर पवित्रे बदलावे लागतात, अन् सुराचा अस्पष्टपणा झाकण्याकरिता शब्दास क्षणोक्षणीं सप्तसुरातून मारे इकडून तिकडे गिरक्या घालाव्या

लागतात. मगच कुठं अस्सल दिव्य गायन माझ्या समोरच्या श्रोतृ-वृंदांच्या कर्णपथावर जायच पण असल ते गायन बाहेर पडल मात्र, ते सारे ऐकणारे खवळून उठतात माझ्यावर, अन् ह्मणतात– " बंद करा ही घरघर ! "

पण जाऊं द्या, त्याच तुह्माला नको वाटून घ्यायला इतकं काहीं. हे अस्संच व्हायचं; ह्मणतातना, " –हे कलियुग ! – "

माझं स्वतःच अस काहींच नाही माझ्याजवळ असं मीं स्वतःच सागून टाकल्यावर अगदी निर्गुण निराकार–शून्यातच बसवाल तुह्मी मला. पण लक्षात ठेवा. मला निर्जीव ह्मटलं तरी तुह्मा सजीवा-पेक्षा मीच दाखवीन जिव्हाळा तुह्माला वेळी अवेळीं. माझं अस माझ्याजवळ काही नसल तरी तुमच जपून ठेवून परत करीन की ··· माझेजवळ एकदा येऊन प्रेमान चार गोष्टी केल्या की माझ्या हृदयावर त्या कायम ठशान कोरल्या गेल्याच समजा. अन् मग मात्र माझे जवळ तुह्मी अगदी सशद्व अमर !

कधी कधी हे असलं अमरत्व दुसऱ्याच कामी मला आणाव लागतं. —

–कित्येक नावाचे कथेकरी, लबाडपुराणिक, खट्याळ मास्तर, पंडित ज्योतिषाचार्य, अन् उरले सुरले गर्धभाचार्यांचे सच्छिष्य ( तुमच्या पैकीं जे कोणी असतील त्यानी क्षमा करावी ) हे देखील अमर होऊन बसतात माझ्यामुळं. मी होऊनच करतो तसं त्याना, ह्मणाना !

तुह्मी ह्मणाल, हे हो कशाला ?

कशाला ?

घटकाभर तुह्मा सर्वाची करमणूक व्हावी आणि ज्याची त्याना लाज वाटून स्वत च्या व्यंगाच स्वरूप त्यानी बदलावं ह्मणून पण खर सागूं ? — ही झाली तुह्मा सर्वाची आपली घटकाभर समजूत ! माझ स्वत च जीवन अस – तुह्मी समजला तस – ' शेरी पासरी ' खास पडलेल नाही ! खऱ्या नामवत गवयाच गायन, विविध वाद्याचे आल्हादकारक स्वरतरग आणि इतर कला-तज्ञाचे, शास्त्रज्ञाचे, विद्वानाचे भावनाबोल तुमच्या थकल्या भागल्या मनाला क्षणभर आनदित करायला वाटेल त्यावेळी, वाटेल तेथे, अगदी त्याच्याच शद्वात, हुबेहुब असतील तस्से पुरवायला मी माझ जीवन कार्य वाहिलेल !

अस हे अति मोलाच जीवन खर्च करून त्यातून मी अहोरात्र गायन-वादन, कलाकुसरीच प्रतिजीवन, रावापासून रकापर्यंत, निर्माण करितो अन् मग श्रोते आनदात बेहोप होऊन जातात, अगदी पागल होतात, आणि गवयाच्या, वादन–पटूच्या, कलावताच्या कलेवर ते सारखा स्तुतिवर्षाव करीत रहातात पण मला काय त्याच ! त्याच्या दृष्टीन मी निर्गुण निराकार, शून्य – निव्वळ भार वाहक ! पण असूं द्या. चागला भार वाहण हे देखील काहीं वाईट नाही. अन् मी ते काही मोठ्या स्वार्थाकारिता करतो असहि नाही. असो.

वार्धक्यकाल चितामग्न स्थितीतच काढावयाचा असतो कीं काय न कळे !

परवाचीच गोष्ट !

मी त्या समोरील काचेच्या अलमारीत मनाशीच विचार करीत स्वस्थ पडलो होतो; तोच वाऱ्याची एक झुळूक उघड्या

खिडकींतून खोलीत शिरली अन् त्याबरोबर टेबलावर पडलेल एक वर्तमानपत्र फडफड करायला लागल त्या फडफडणाऱ्या पानावर भल मोठ्ठ चित्र काढल होत. ( त्याला ' रेडिओ ' म्हणतात अस मागाहून कळल मला ! )—ते दाखवून, नि माझ्याकडे कुत्सित कटाक्ष फेकून ते पुटपुटल, " ह आता आपण आहात तस्से बसा बर, जगाच्या – निदान स्वतःच्या अतापर्यंत तरी विचारणार कोण आता आपणाला ! हें इथलच पहाना, माझ्या मालकान हे समोर ठेविलेल " दिव्य यत्र " आणल्यापासून आपली स्वारी पडलीय धूळ चाखीत, आतल्या आत ! " ते उर्मट बोलण ऐकून अन् त्याचे ते विचित्र हावभाव पाहून अस्सा राग आला होता मला की काच फोडून एकदम यावं बाहेर अन् चागलीच झणझणीत ठेवून सागाव– " मूर्खा तुझ्या ह्या चवचाल मालकाची मला तरी काय गरज आहे ! मी अस्सा जाईन खेड्यापाड्यातून अन् त्या बिचाऱ्या गरीब पण सत्शील प्राण्याची तरी करीन थोडी करमणूक ! गृहस्थाश्रमातून वानप्रस्थाश्रमात जाऊ द्यायच हे महा पुण्य लाभूं दिल्याबद्दल तुला, नि तुझ्या मालकाला त्रिवार साष्टाग नमस्कार !!!

अरे पण कशाला आता ही बडबड ! भावनेच्या भरात उगीच वहावलो अन् घसा मात्र कोरडा करून घेतला ! ' बरय नमस्कार " पण जाता जाता थोडं कराल का माझं काम पहा कशी घरघर होतेय सारखी; कोरड पडली वाटतं ;
– द्याना ' चार पोलादी मात्रेचे वळसे '
– देता ना ? .

# ४. नभोवाणी

• नित्य नवं जग !—माझ्याकडे— •
• बघितलं का इकडे ? का कशी आहे •
• ही माझी अदृश्य माया ! •

इतक्या लहान वयात नि इतकी लोकप्रियता संपादण्याचं सौभाग्य माझ्याशिवाय इतर कोणाच्या वाट्यास क्वचितच आलं असावं !

निसर्ग नि मानव !

निसर्ग किती प्रचंड !

अन् मानव ?

अजस्र हत्ती पुढील एखादं क्षुद्र मच्छर जणु !!

पण मानवाच्या बुद्धीची धाव अमर्याद, निसर्गावर ताबा मिळविण्याची केवढी तीव्र इच्छा त्याला !

अफाट नि खवळलेल्या दर्यावरूनहि आपल्या " विलासी अन् भव्य राजवाड्यातून " तो सुखानं प्रवास करूं लागला, रत्ना-

कराच्या अंतरंगांतूनहि सहली करण्यास त्यानं कमी केलं नाहीं; तसंच अनंत अशा आकाशांत स्वेच्छेनं भराऱ्या मारण्यासहि बाकी ठेवलं नाहीं.

पण अमर्याद आकाशांत किंवा खवळलेल्या अफाट समुद्रांत असतांना निसर्गाचा भयाणपणा भेडसावूं लागला. त्या स्थितींत आपणांस आपल्या घराशीं–गणगोताशीं संबंध ठेवतां आल्यास बरं असं त्यास वाटूं लागलं. अन् याच दिशेनं केलेल्या अचाट प्रयत्नांचं " माझा जन्म " हें दृश्य फल होय.

श्रीमती सौदामिनी देवी ही माझी जननी. तिची चपलता मजमध्यें–कांकणभर जास्तच म्हणाना,–उतरली आहे. माझं आईवर निरतिशय प्रेम आहे. तिच्यावांचून मला एक क्षणभरहि एके ठिकाणीं रहावत नाहीं.

माझ्या जन्माचे पूर्वी बातम्या पाठविण्याचं नि मागविण्याचं काम सर्वस्वी तारायंत्राकडून करवून घेण्यांत येई. त्या पायीं केवढी दगदग ! ठिकठिकाणीं जस्ती पत्र्याचे खांब उभे करावे लागत. अन् त्यांवरून तांब्याच्या तारा खेचण्यांत येत. शिवाय त्यानंतर त्यांची सदान्कदा निगा ठेवावी लागे ती वेगळीच. जर का मध्येंच तार तुटली कीं सर्व कारभार थंड !

पण आतां माझ्यामुळं हा सर्व खटाटोप मुळीं नाहींसाच झालाय्. मला ते खांब नकोत कीं त्या तारा नकोत. माझं स्वरूप अति प्रचंड नि व्यापक. सर्व आकाश व्यापूनहि उरतंच ह्मणाना.

पूर्ण स्वच्छंदानं गगनातून विहार करण्यांत मला पराकाष्ठेचा आनंद. अशा स्वतंत्रवृत्तीच्या मला खांबाचे टेके दिलेल्या तारांचा आखीव मार्ग कसा रुचावा ? ऐकलंत का, एक मित्रहि आहे मला, बर कां. त्याचं नाव ' ईथर ' भारीच तरल स्वभावाचा तो जिथं या बाळाचं अस्तित्व नाही असं जगाच्या पाठीवर एकहि ठिकाण नाहीं. याच्या मैत्रीमुळं मीहि तितक्याच तरलतेनं निमिषार्धात सारी पृथ्वी भटकून परत त्याच ठिकाणी येऊं शकते अभेद्य समजल्या जाणाऱ्या पोलादी भिंतींतूनहि सहज आरपार निघून जाणं ज्या मला शक्य, त्या मजपुढे माती विटा—दगडचुन्याच्या भिंतींची काय बिशाद !

मजमुळं जगातील अंतर जणु नाहीसंच झालय् !
" घोडे कधीं न खळती रविच्या रथाचे " अशी ज्याची कीर्ति त्या सूर्यासहि एकदा निघालेल्या ठिकाणी परत येण्यास जिथं तब्बल २४ तास लागतात, तिथं मला चोवीस सेकंदहि पुरती लागत नाहींत म्हणूनच माझ्या जन्मामुळं ' मनोजव ' ही उपमा पूर्णांशानं सार्थ आहे. खरं की नाही ?

निरनिराळ्या ठिकाणी एकाच वेळी चाललेला जगांतील जग-ड्व्याळ पसारा आता मजमुळं एका सूत्रांत गोवं म्हटल्यास ते शक्य होईल मनांत आणलं तर एका खोलींत बसल्या बसल्या एखादे विवक्षित जहाज, पाणबुडी वा विमान या वेळीं कुठं आहे याचा नक्की ठावठिकाणा मजमुळं तुम्हास लागू शकतो. व तुम्ही माझ्या सहाय्यानं त्यावरील तुमच्या गणगोताशीं सहज वार्तालाप करूं शकतां.

गधर्व–स्वर किन्नरींच्या गायनाचे जलसे असेनात का मुंबईस वा दिल्लीस. पण मी त्याच्या त्या मधुर सगिताचे आलाप क्षणार्धात सर्व जगभर फैलावून देते अन् या मुळच त्याच्या स्वर्गीय गायनाचा लाभ त्यांच्या चहात्यास मग ते जगाच्या पाठीवर कुठहि कां असेनात मीच तर करून देते

नुकताच मुबईस झालाना क्रिकेटचा प्रसिद्ध चौरगी सामना ? तो चालू असता त्याचा समग्र वृत्तात 'आधुनिक सजयान' माझ्या द्वारेच तर ऐकविला तुह्मा सर्वांस ! अन् त्याच प्रमाणं महात्म्याचे शुभ संदेश, सार्वभौमाचे समारोप, पत प्रधानाची रसभरित नि विद्वत्ताप्रचुर भाषण किंवा 'हुकुम शहाच्या' हुकुमी गर्जना त्याच-क्षणीं मीच तर ऐकविते तुह्माला. नाहीतर कुठ भारतवर्ष, कुठ इंग्लड–युरोप नि कुठ अमेरिका ! पण मा ऽ ऽ री ग्वड जणु अगदी शेजारीं शेजारीच आलींत मजमुळ !

सुधारणेच पाऊल पुट पुढ सारख पडतच आहे ह्मणतात एका पिटीच्या नतर येणाऱ्या दुसऱ्या पिढीतहि काही सुधारणा झालेली दृष्टीस पडतेच.

माझंच पहाना ! श्रीयुत 'ग्रामोफोन' हे माझे चुलते किती विख्यात सगीतज्ञ ! पण अस असूनहि माझ्यापुढ कीर्तीन माग पडले त्यांच तेच तेच नि मर्यादित सगीत तुह्मास वृद्धाच्या वटवटीप्रमाणं कर्णकटु भासू लागलंय रोज नव अद्यावत् सगीत नव अन नवं नवं जग हव ना तुह्माला ! ·

जसे काहीं गुण, तसे काही दुर्गुणहि पण पुढील पिढीत असतात हो नाही तर सारेच गुण समजाल तुह्मी. आमचे चुलते आठवणीचे दाडगे स्मरणशक्तीत ते ब्रह्मदेवासहि हार न जाणारे. एखादी गोष्ट याचे कानावरून ओझरती का जाईना ती मग याचे जवळ अमर ! हुबेहुब तश्शी, पण आमचा नि स्मरणशक्तीचा छत्तिसाचा आकडा गायनहिरा सौ. हिराबाईचा जलशा शभरदा झाला असेल; नि त्याची प्रसिद्ध गाणी ऐकून ऐकून तुह्माला पाठसुद्धा झाली असतील. ( मीच तुह्मास कित्येकदा ऐकविलीत. ) अन् असं असूनहि मला मात्र त्यातील एक ओळ ह्मणाल तर आता आठवण कठीण !

पण कधी कधी वाईटातून देखील चागलच निघत माझा विसराळूपणा हा मजवर एक मोठा अनुग्रहच वाटत मग तुह्माला, थोड, मी दुसर काही सांगितल्यावर

मी माझ्या स्मरणशक्तीला कोणताच ताण देऊ इच्छीत नाही. याला कारण ह्मणजे मला जगात नित्य अति वेगवान दूताचं काम करावं लागत सारखी बाराहि महिने नि चोवीस तास सारखी बडबड ! दुसर, लोकाची बरी वाईट गुपित लक्षात ठेवण ह्मणजे स्वतःला घोर नी काळजी लावण ! मग आता तुह्मीच सांगा हा सारा मानसिक जाच स्मरण शक्तीच्या अभावीच मी विसरू शकते ना ? नाही तर अकाली वार्धक्य येऊन मी केव्हाच गलित–गात्र झाले असते !

मज मधील तडफ, धडाडी नि चाचल्य आज या दुर्गुणा (!) मुळंच तर टिकलय, खर की नाही ?

जाता जाता थोडं सांगते. माझी पाठची बहीण, लवकरच तुह्माला देईल स्वतः आपली ओळख करून. पण मी इतकंच सांगून टाकतें कीं ' माझ्या वाणी ' च तंत्र तर तिन बेमालूमच आत्मसात् केलंय. पण त्याच बरोबर कोणतहि दृश्य दाखविण्यातहि ती अति तरबेज होणार ! तुह्माला कुठ भेटलीच तर पहा माझ्या बोलण्याची प्रचीती. हो पण नाव ठेवते सांगून तुह्माला, मग सांगूच का ? .... तिचं नाव " दिव्य दृष्टि " उर्फ ' टेलीव्हिजन ' (Television) मग काय राहील ना लक्षांत ?

# कॅमेऱ्याला बळी !

रोजच्या व्यवहारांतला दाखला द्यायचा झाला तर पडल्याविना सायकल येत नाही ह्मणतात हे सारं माहीत असून कोणी उगाच पेट करतात, मग शेवटी अस्से फजीत होतात—

" ऋषीचं कूळ नि नदीचं मूळ " पाहू नये ह्मणतात, तें जितकं खरं तितकच कोणीहि एकाद्या कलावंताच्या लहानपणातील अध्ययन व्यासंगाकडेहि न पहाणच बरं, असं मी ह्मणेन. कारण माझ्यावरूनच पहाना. आज जरी तुह्मी मला एक नामांकित फोटो-ग्राफीचा अगदीं अर्क समजत असला तरी प्रथम ज्या कॅमेऱ्याचे सहाय्याने मी फोटोग्राफीचे प्रवेशद्वार ओलांडून आजच्या स्थितीला

पोहोचलो, त्याने त्यावेळी माझ्या हातून काय काय आणि कसकसे प्रताप गाजविले, हे जर मी तुह्मास सागत बसलो तर तुह्मी अगदी पोट धरधरून हसाल, अन् ह्मणाल सुध्दा, " हो बुवा, खरय आहे तुमच ह्मणण "—

\+ + +

तो एक मी नुकताच घेतलेला ' ब्राऊनी बॉक्स ' कॅमेरा होता. नवीन वस्तूचा चाळा मनुष्याला फार लागतो तद्वत् अगदी नवीन नवीन, जो जो ह्मणून कोणी माझ्या कॅमेऱ्याच्या टापूत येण्यास त्यावेळी योग्य वाटला, तो तो त्यातून सहसा सुटला नाही घरातली सर्व माणस, पाळीव जनावर तर मी पहिल्या एक दोन रोल मध्येच उडविली, आणि मग बाकी राहिलेल्याचा हळूहळू समाचार घेतला. ह्या सर्वांच्या बऱ्या वाईट स्नॅप्सचा मी तयार केलेला ' अल्बमवजा ' भारा कोणीहि नवीन दिसला की त्यापुढ करी, आणि त्यान, " अरे वा वसतराव तुह्मी तर आता ' फोटोग्राफर ' झाला बुवा ! " अस ह्मटल की मी ह्मणे, " कसच काय हो, आपल आहे झाल काहीं तरी. "

पण काही दिवसांनी आजू बाजूच्या सर्वांचा समाचार घेतल्यावर एखादेहि सावज लाभण कठीण होऊ लागल. अन् मग एके दिवशी ' बाळेबा ' नुकतेच वाईहून आले आहेत अस कळल, तेव्हा तर माझा आनंद काय विचारता ! मी तावडतोब माझं आयुध घेऊन त्याचा बंगला गाठला. स्वारी नुकतीच जेवण उरकून विडा

चघळीत इशीचेअरवर पडली होती अगदी खड्या सुरात आमच स्वागत झाल्यावर व थोड्या औपचारिक गोष्टी सपल्यावर मी फोटो-ग्राफी—संबंधी काही अवातर गोष्टी काढल्या, आणि त्याचबरोबर जवळच्या कॅमेऱ्याची एका हातातून दुसऱ्या हातात सारखी चाळवा-चाळव सुरू ठेविली. हेतु हा कीं त्यान माझ्या नूतन कॅमेऱ्यासंबधी काही विचाराव. पण तो कसला खमग ! एक नाही कीं दोन नाहीं. माझा ग्रह झाला की, याच व कॅमेऱ्याच काहीं तरी वाकड असल पाहिजे. अन् अखेर तेच खरं ठरल कारण कंटाळून शेवटीं जेव्हा मीच त्याला सर्व सागितल, तेव्हा तो ह्मणतो काय, "वश्य। " फोटोबिटो काढून घ्यायला मी अगी काय गाजविली आहे रे ? आपण तर नाही बुवा तुला काढू देणार आपला फोटो "

" मोठा आलाय आजोबा ! आपण तर तुझा एखादा स्नॅप खेचणारच. मग तू काहींहि ह्मण. "

" काय तूं माझा स्नॅप घेणार होय ? बरय राजेश्री पाहून घेऊ ! "

+ + + +

त्या गोष्टीला सुमारे दोन महिने लोटले पण माझ्या कॅमेऱ्याला बाळ्याचा बळी पडण्याचा काही संभव दिसेना. तसं ह्मटल तर आमच्या गाठी भेटी नेहमीच होत पण समोरासमोर त्याचा फोटो काढणं मला साधेना. पण लवकरच एक सुंदरसा योगायोग अचानक घडून आला.

आमच्या सर्व मित्रमंडळींनी एके दिवशीं "पिक्निक्ला" जायचा बेत ठरविला. त्या प्रमाणे इच्छित स्थळीं सर्वजण जमल्यावर

समोर बसलेल्या ' बाळ्या ' च लक्ष माझ्याकडं नसून चहाच्या कपाकडेच असल्याबद्दल खात्री करून घेऊन मीं हळूच किल्ली फिरविली व इच्छित नंबर काढला. आणि तो, आता एक्स्पोझ करणार तो काय नशीब ! आंतून मला बहिणीची हांक ऐकूं आली. मला भीती वाटली, न जाणो ती इथे आली तर सर्वच घोटाळा व्हायचा. ह्मणून ' बाळ्या ' कडं एक नजर फेकून मीच आत पळालो. अन् थोड्याच वेळात जेव्हा परत आलो तेव्हां त्याचं चहापान होऊन पोहे खाणच चाललेल पहाताच माझा जीव खाली पडला कारण त्यावरून कॅमेऱ्याच अस्तित्व अद्याप त्याला माहीत झालं नसाव, हे उघड होत. मी हळूच बटण दाबून दोन सेकंदाच एक्स्पोझर दिल, अन् खलास ! माझ्या त्या चपळाईबद्दल मलाच धन्य वाटल. मी सहज ' बाळ्या ' कड पाहिलं; तो खिडकीकडे पहात हसत असावा. तस्साच कॅमेरा घेऊन मी उठलो, व त्याला ह्मटलं, " चल, बाळ्या, शेजारच्या दौलतराव फोटोग्राफरकडे एक रोल डेव्हलपिंगला द्यायचा आहे "

" कसला रे रोल ? " त्यानं पृच्छा केली—

" तुला त्याची नसती उठाठेव ? तूं चल आपला मजबरोबर जरा " मी हंसत हसत उद्गारलो.

पोह्याची शेवटची फक्की मारून तोहि उठला त्याच्या चेहऱ्यावर अजून स्मिताची झाक चमकत होती.

दौलतरावाकडे गेल्यावर कॅमेरा त्याचे पुढं ठेवीत मी ह्मटलं, " दौलतराव, जलदी करा बुवा; हा एवढा रोल डेव्हलप करायचाय्;

संध्याकाळ पावेतो मिळाला तरी चालेल पण काम असं झालं पाहिजे कीं यव ! पैशाची मुळीच काळजी नको. आणा दोन आणे इकडे कीं तिकडे ” ·

गुंडाळलेला रोल काढण्यासाठी ह्मणून मीं कॅमेऱ्याचं झाकण उघडलं मात्र. तो काय ?

आत रोलचा पत्ताच नव्हता !!

अरेच्या !

माझ्या तोंडून एकदम आश्चर्योद्गार बाहेर पडायला आणि ‘ बाळ्या ’ चौमजली हसण्याला एकच गाठ पडली. हळू खिशात हात घालून त्यानं एक गुंडाळलेला रोल बाहेर काढला अन् ह्मटलं--

“ भले ऽ ऽ महाराज, हा घ्या आपला रोल. मग इतका वेळ किल्ली फिरविण्याचं सोंग करीत होतास कीं काय ? ”

मीं दौलतरावाकडं पाहिलं. त्याना तर हसू आवरतंच नव्हतं.

“ तरीच ”

माझ्या डोक्यात प्रकाश पडू लागला. मी घरांत गेलों त्या वेळींच बेट्यानं रोल काढून घेतला होता अं ! खरोखर, बाळ्याची त्यावेळची हातचलाखी अगदीं वाखाणण्याजोगी होती. पण त्याच बरोबर त्या दोलत्यासमोर त्यानं केलेला माझा अपमानहि कांहीं लहान सहान नव्हता. पाय आपटीत आपटीतच व पायऱ्या उतरतांना मी संतापानं बेभान होऊन ओरडलो, —

नको समजूं. मला खात्री आहे की ह्या क्षणभर टिकणाऱ्या उन्हात तुला माझा स्नॅप घेताच येणार नाही मुळी ''

खरं सागायच ह्मणजे त्यान मला चकविण्यासाठी तो एक डाव टाकिला होता. पण त्यावेळी तो मला उमगला नाही हेंच खरं.

कॅमेऱ्यात रोल असल्याबद्दल प्रथम पूर्ण खात्री करून घेऊन एका झटक्यात मी बटन दाबल; आणि काय मजा पहा! खरोखरच त्या क्षणानंतर सूर्याची ती कोवळी किरणं बाळ्याच्या गालावरून सरकून लाबवर पसरली गेली. 'केवढ माझं भाग्य! अन् किती चपळाई!' माझ मलाच आश्चर्य वाटलं. त्याच्यावर मिळविलेल्या कल्पनातीत आनंदात मी उद्गारलो "कसं काय बाळ्याजी, आता काय बोलणार ह्मणा. किती स्फूर्तीन काम केल ह्या पठ्यान.!!"

मागचीच एखादी चूक आता पुढ व्हायला नको ह्मणून तिथंच कॅमेऱ्यातून रोल काढून तो मीं बदोबस्तानं आतल्या खिशांत कोंबला.

"आता वेळ लावूं नकोस बुवा. चल झटकन एखाद्या फोटोग्राफरकडे—पण एखाद्या कशाला? त्या दौलत्याकडेसच जाऊ परत. हंसत होता ना त्या दिवशी माझ्या शहाणपणाला? आता बोल ह्मणावं!"

टेकडी उतरतांना बाळ्या ह्मणाला,

"बघूं रे वश्या, तुझा कॅमेरा कसा काय आहे तो इतके

दिवस झालेत, पण अजून पाहिलाच नाहीं की.

रोल आधीच काढून घेतल्यामुळं मला भीती नव्हतीच ह्मणा, पण नसत्या फुशारकीनं मीं ह्मटलं, " हं महाराज, आपल्याला नाहीं ते जमणार. द्या तो इकडे. ह्मणतात ना, " पिशाच्च्या हातीं कोलीत ! " त्यावर तोही हसत हसत ह्मणाला, " आहे खर बुवा ! हो, " जेणो काम तेणो थाय अन् बीजा ·

माझ्या हातात कॅमेरा देता देता डायफ्रेमचा पत्रा खालवर करीत त्यान विचारल, " वशा, अरे हे रे काय ? "

" अहारे वेड्या ! येवढहि समजू नये ! " मी वेडावीत ह्मटलं.

पण त्यानं उत्तराची अपेक्षाच केली नसावी. तो आधीं-पासूनच हंसत असावा. व अजूनहि हंसतच होता पण ते का, हें मात्र मला त्यावेळी कळल नाही आणि कळल ते थेट पुन्हा त्या दौलत्या फोटोग्राफरकडेच !

जेव्हा आह्मी तिथं पोहोचलो तेव्हा दौलतराव ' डार्क रूम ' मध्यें ' प्रिन्टींग ' कीं कायस करीत होते. माझा ओळखीचा शब्द ऐकताच ते बाहेर आले.

" याऽऽ हो, वसंतराव. आज काय आणलत बुवा ? काढा काढा काहीं डेव्हलपिंग सारखं असल तर; सोल्यूशन अगदीं तयार आहे. "

आंतल्या खिशातून रोल काढीत मीं ह्मटलं, " हं लवकर बरं, आत्तांच्या आत्तां रिझल्ट पहायचाय. "

" आणतोच की इतक्यात, " बाईबाईने आत जाताना ते पुटपुटले, व जवळच्या बाकावर बसण्याबद्दल हातान खूण केली.

ज्यावेळी ते पुन्हा खसकन पडदा सारून बाहेर आले त्या-वेळी माझ्या अंत.करणात भावनाचा पूर उसळला होता. त्याच्या हातातल्या फिल्मच्या त्या लांब पट्यातील इतर कोऱ्या नंबर्सकडे लक्ष न देता ' बाळ्याच्या ' त्या शेवटच्या फोटोवरच माझी नजर खिळली. माझ्या तोंडून शद्ब बाहेर पडण्यापूर्वीच हसत हंसत ' बाळ्याच्या 'च फिल्मकड पहात दौलतराव एकदम उद्गारले, " वा वसंतराव, ह्या खेपेस तर कमालच केलीत बुवा तुह्मी ! "

माझ अंत:करण आनदान गच्च भरून गेल. त्यामुळ क्षणभर मी जागच्या जागीच खिळून गेलो ! पण माझ्यापेक्षा जास्त उत्सुक असलेला बाळ्या फिल्मकडे एकदम धावला. निमिषमात्र स्वत.च्या चित्राकडे पाहून त्यान जोराची टाळी वाजविली, आणि ओरडून ह्मटल " ये, ये, वशा, असा जवळ ये, आपण दोघंहि पाहू. "

मी उडी मारून त्याच्या जवळ गेलो. अन् पहातो तो काय ! घासाशी खेळता खेळता चुकून सरकलेल्या अर्धवट —– ' डायफ्रेम ' नं केवढा घोटाळा केला होता ! ...... .

... बहुतेक सबंध फिल्म काळी झाली असून, एक्स्पोज झालेल्या तिच्या वरच्या कोपऱ्यात ' बाळ्याच्या नुसत्या झिपऱ्याच ' आसमंतात उडत असल्याचा स्पष्ट देखावा मला दिसला.

—— ——

# खरा 'यशवन्त'!

**हाताशीं आलेलं यश सोबत्याच्या वाट्याला दिलं;**
**नि तरी देखील देणारा 'यशवन्त' च राहिला!**

रेसीडेन्सीजवळच्या विस्तृत पटांगणावरील चुन्याची शुभ्र आंखणी जवळ जवळ संपत आली होती सारें मैदान येथून तेथून अगदीं स्वच्छ व पांढरें शुभ्र दिसत होतें. त्या भव्य पटांगणा भोंवती लोकसमुदाय बसण्यासाठीं लाकडी फळ्यांच्या बैठकी केल्या असून त्यावर बांबूच्या तट्ट्याची दाट छाया केली होती.

एका बाजूच्या कांहीं भागांत राखीव तंबू व कनाती ह्यांची सोय केली असून तेथेच दोन 'लाऊड स्पीकर्स' हि लावले होते, व त्याजवळच दोन तीन लहान मोठे फलक मजबूत सांगाड्यांनीं उभे केले होते. त्यावरील "ऑल इंडिया स्कूल्स टूर्नामेन्टस् १९४०" हीं अक्षरें बऱ्याच लांबूनहि दिसत होतीं.

पटांगणाच्या पश्चिम भागास जीं थोडीं आंब्याचीं झाडे हारीने उभीं होतीं त्याच्या दाट छायेच्या आश्रयाने चहाचिवडयाचीं व फळफळावळांचीं काहीं दुकाने मारे सुशोभित केलीं जात होतीं. त्यां जवळच पाणी पिण्यासाठीं व सायकल्स ठेवण्यासाठीं मोठीं थोरली शेड मुद्दाम तयार करण्यात आली होती.

यंदां अखिल भारतवर्षीय खेळांचे सामने मोठ्या चुरशीनें येथे व्हावयाचे होते. येथील हायस्कूलचे नाव गेल्या ३-४ वर्षांपासून ह्या सामन्यात प्रामुख्याने गणले जाई. त्यामुळे सहाजिकच ठिकठिकाणच्या क्रिडापटु विद्यार्थ्यांची गर्दी तेथे मनस्वी होई. बऱ्याच लांबून असे विद्यार्थी येण्याचे दुसरेहि एक कारण होतें प्रतिवर्षी सामन्यात चमकणाऱ्या व चॅंपियन ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळा स्वखर्चाने पुढील शिक्षण देण्याकरिता बाहेर पाठवे, व नंतर त्याच्या निर्वाहाची सोय तेथे किंवा शिफारसीने बाहेर करण्यातं येई

रेसीडेन्सीग्राउंडला वळसा देऊन जी एक सडक शहराकडे जाई ती थेट शाळेवरून. डिसेंबर सपून जानेवारी लागताच शाळेसमोरून जाणायेणारे क्षणभर सहज थांबत व शाळेच्या मैदानावर खेळणाऱ्या त्या बालविराकडे मोठ्या कौतुकानें दृष्टी टाकून लवकरच सुरूं होणाऱ्या सामन्यांत त्यांना व शाळेला यश मिळण्याबद्दल मनोमय चिंतून मगच पुढे पाऊल टाकत.

हळूं हळूं अंधार पडत चालला;

शाळेच्या रस्त्यावरील रहदारी कमी होऊं लागली; तरी कांहीं विद्यार्थी अजून मनमुराद खेळतच होते; त्यांचे भोंवतीं कित्येकजण

घोळका करून मोठ्या उत्सुकतेनें जमले होते. फुटबॉलचा होणारा दणदणाट त्या प्रेक्षकगड्याच्या आरडाओरडींतून क्वचितच बाहेर पडे.

इतक्यांत वर आकाशांत फुटबॉल खूप उंच उडाला, अन् दुसऱ्याच क्षणीं एका बहाद्दर गड्याने तो जमिनीवर पडण्यापूर्वीच आपल्या वज्रप्राय डोक्याच्या फटकाऱ्याने जोराने अचूक गोलमध्यें झोंकला ! त्याबरोबर " ओहो ऽ ! शाब्बास ! वारे पठ्ठे ! ऽ ऽ – " अशा आनंदाच्या लहरी वातावरणांत जोरानें उमटल्या.

खेळ संपला.

खेळणारे एकत्र जमले. सारेच घामाने कसे निथळत होते ! बघणारेहि त्याच्या भोवतीं गोळा झाले. त्याच्या डोळयात कौतुकानं – आणि अभिमानानं पाणी उसळून आल.

यंदाच्या सामन्यांत चुरशीला लावण्याकरिता शाळेनं निवडलेला तो प्रत्येक कसलेला गडी ह्मणजे अगदीं एकेक रत्नच असं वाटत असाव त्याना.

शाळेच्या हॉलमध्यें अजून प्रकाश दिसत होता तिकडेच सर्वांनीं मोर्चा वळविला.

हॉलच्या मध्यभागीं दिव्याजवळील एका खुर्चीवर शाळेचे गेम्सटीचर– " श्री. संत " आपल्याशींच विचार करीत स्वस्थ बसले होते.

थोड्याच वेळांत सारीं मुलें तेथें येऊन पोहोंचलीं. तथापि संत मास्तरांना त्यांच्या येण्याची चाहूल कितीतरी वेळ लागलीच नाहीं. त्यांचे दोन्हीं डोळे समोरच्या कागदावर अगदीं खिळलेले. इतक्या खोल विचारांत ते क्वचित्च दिसत.

" सर, आपण आठवण केली होती का आमची ? " हळूच पुढें टेबलाशीं किंचित् टेकलेला तरूण उद्गारला.

मास्तरानी समोर पाहिल; सभोंवार नजर टाकली; आणि मग त्यांचच त्यांना जरासे आश्चर्य वाटल !

" अरे तुह्मी उभे कां सारे ? बसाना ह्या बाकावर. किती वेळ झाला तुह्मां साऱ्याना येऊन ? "

" हे आतांच आलो, सर " —

बाकावर सारेच जण बसण शक्य नव्हतं मास्तरांच्या ते लक्षात आलं. ते स्वत.च खुर्चीवरून उठले, घातलेल्या सतरंजीवर दिवा घेतला आणि मग सारेच खालीं बसले

किती तरी वेळ त्यांच्या गप्पा चालल्या होत्या.

कोणीं मागील वेळचे आपले गमतीदार अनुभव सागितले. –

" अरे, तो रघू पिंपळवाडकर एरव्हीं पाच फूट सहा इंच हाय जंप करणारा; पण मैदानाच वार लागऊ कीं काय ? तो गेल्या वेळीं पाच–दहा कुदला. ह्या यशवतान रेकार्ड मोडल ह्मणा पण ती मी एक गमत सागितली. " नितक्यात दुसरा एक ह्मणाला, –

" अन् माझंच पहाना. मला संत मास्तरांनी गेल्या हंड्रेड यार्डस् मध्यें ठेवल होत. मला स्वत:ला काही खात्री नव्हती. मैदानावर सारे जमले; आणि आता हलत्या निशाणाबरोबर रेस सुरू

होणार, तो एकाएकी माझे पाय लागले लटलट कापायला. ते पाहिल आमच्या ह्या मुरब्बी यशवतरावानी, पण इतक्यात —

एकदम रेस सुरू झाली,

एक पारशी गडी आणि दुसरा कोणी तरी मला किंचित् घासून पुढे निघून गेले. मी निराश होऊन जरा मागे बघितल तो यशवत माझेच मागे होता. माझ पाऊल जड झाल; अगाला दरदरून घाम आला. जवळ जवळ अर्धी रेस झाली होती. यशवताने मला जरा धक्का दिल्यासारख केल.—" ह तो पहा, आता शेवटचा उरला सुरला देखील चालला तुझ्यापुढे निघून. अन् हे पहा, हा मी आता चाललो,—" अस काहीस पुटपुटत त्यानं जी धूम ठोकली !····अन् मग मलाही स्फुरण चढलं; माझे डोळे क्षणमात्र मिटले; आजूबाजूच्या जगाचा किंचित् विसर पडल्यासारख झाल अन् नकळत अगात त्राण असेल नसेल इतक्या वेगाने मी पायांना गति दिली.

शेवटीं, अन् शेवटी काय ! यशवताने तर आधीच मोर्चा गाठला पण मी देखील तिसरा आलो !···हं, मैदानाच असं सारच विचित्र असत पहा ! "

या नंतर कित्येकानी आपापले अनुभव सांगितले. ते सारं ऐकून नव्या गड्याना करमणूक तर झालीच पण प्रत्यक्ष मैदानाचं विलक्षण कुतुहल वाटूं लागल.

शेवटीं संत मास्तरांनी साऱ्यानाच दोन शब्द सांगितले. " अन् माझी आणि साऱ्या शाळेची भिस्त आतां तुह्मांवर आहे

बरं का ? " अस ह्मणून त्यानी सर्वांवरून एकदा नजर फिरविली.

थोडयाच वेळात मडळी जाण्यासाठी उठली. त्याच्यापैकी मास्तराच्या लगतच बसलेल्या दोघा तरूणास मात्र त्यानीं जरा बसवून घेतल.

मडळी गेल्यावर त्यानी त्या दोघावरून एकदा नजर फिरविली, आणि त्याच्या मूळच्याच पाणीदार डोळयात अभिमानाचं पाणी तरळूं लागल; चेहऱ्यावर समाधानाची छटा उमटली.

त्याच्या आणि शाळेच्या जीवन–संग्रामातील आज उद्याचा तो प्रसंग ह्मणजे केवढा अटी तटीचा ! मागील २-३ वर्षापासून ' जयश्री ' एकदाही मागे फिरली नव्हती. मग ह्या वर्षी ? छे ! त्यानी आपल्या समोर बसलेल्या त्या दोघाही हसतमुख तरुणावर पुन्हा एकदा दृष्टी टाकली अन् त्याबरोबर त्याच्या मनातले सारेच विकल्प कोठल्या कोठे विरून गेले. अन् मग क्षणमात्र शाळेशीं सबंध आल्यापासून त्या दोघाच्या रम्य जीवनाची चित्र त्याच्या डोळयापुढे झरझर फिरूं लागली.

... तीन वर्षे झालीं असतील. एक उच अन् हसतमुख तरूण आठवीत भरती झाला. खेळाकडे त्याचा मनस्वी कल. अन् तसा तो होताही जात्याच हुषार. थोडक्याच दिवसांत कित्येक खेळात त्यानं नाव मिळविलं. कोठे काहीं असलं कीं त्यानं त्यांत भाग घ्यायचा अन् शाळेला कधींच हार खाऊ द्यायची नाहीं. अगदीं पहिल्याच वर्षी टूर्नामेंट्स् मध्ये त्यानं असं कांहीं विलक्षण नांव केलं. की प्रत्येकाला तो शाळेचा मोठा आधार वाटूं लागला.

स्पोर्ट्स् पासून क्रिकेट पावेतो हा आपला ठेवलेलाच; त्यामुळे त्याच्या वाचून कोणत्याही खेळास रंग चढत नसे · आपल किती प्रेम बसल त्याच्यावर मग ! त्याच्या त्या बेडर अन् हसतमुख चेहऱ्याकडे एकदा पाहिल्यावर यशापयशाची चिंता आपणास कधीच यायची नाही आपण कित्येक वेळा ह्मटल देखील —
" जोपर्यंत हा यशवंत करमळकर शाळेतर्फे सामन्यात उतरेल तोपर्यंत शाळेचं नाव कधीच माग पडायच नाही "– अन् झालहि पुढे लागोपाठ तसच गेली दोन वर्षे

पण त्याच्या ह्या उज्वल शालेय जीवनाबरोबर त्याच गृहजीवन तितकस चागल नव्हत पितृहीन मुलाच सगोपन वृद्ध माता कस तरी करी एवढच. ह्याचं यशवताला कधी कधी फार वाईट वाटायचं; पण पुढे —यदा परीक्षा पास झाल्यावर––गेल्या २-३ वर्षांप्रमाणं त्यान ह्या वर्षीहि सामन्यात मोठ यश मिळवल कीं त्याचा पुढील सर्व भार शाळेन उचलायचा अस जवळ जवळ ठरून गेल होतं. त्याला फार आनद झाला. त्याच्या वृद्ध मातेच्या डोळ्यात तर आनदाश्रू उभे राहिले ते ऐकून. ते सार कळल्यापासून त्याचा आपणावर केवढा लोभ जडला ! आपल्या आणि शाळेच्या यशाची त्याला केवढी कळकळ वाटू लागली ! शाळेच्या भाग्यान यदा त्याला एक जोडीदारही मोठा सुंदर मिळाला !––

शाळेची कार्टरली नुकतीच झाली असेल एक अठरा एकोणीस वर्षांचा विद्यार्थी सातवींत ( मॅट्रीकमध्ये ) दाखल झाला. त्याच तें बाधेसूद शरीर अन् मनमिळाऊ स्वभाव ह्यामुळे त्याने साऱ्याना लवकरच आपलंसं केल, शाळेत त्याचं सगळ्यात जास्त लक्ष असेल

तर खेळाकडे. कोणत्या ना कोणत्या तरी मैदानावर हा आपला नेहमीं दिसायचाच. कधी कधीं कोणीच नसल तर एकटाही खेळे साऱ्या मैदानभर चौफेर ! हे त्याच वेड केवढ्या तरी थराला गेल होत !

एकदा तर मोठीच गम्मत झाली !

स्वत. हेडमास्तराचा त्या दिवशी त्याचेवर तास होता. ते काहींस शिकवीत होते. पण ह्याच लक्ष होत ' ग्राउड ' वर काही मुल फुटबॉल खेळत होती त्याच्याकडे. त्यात विशेष गोष्ट ही की एका बाजूची मुल विशेष तडफदार पडल्यामुळे बॉल बहुतेक दुसऱ्या अर्ध्या भागावरच उडत राही. तशातच एक गोल होऊनहि गेला. बिचाऱ्या दुसऱ्या बाजूच्या मुलानी पुन्हा धडपड सुरू केली; पण काही जमेचना. क्वचित् एखादा एकटाच मुलगा मोठ्या मिनतवारीनं बॉल घेऊनही येई गोलपर्यंत. पण गोल काहीं होईना !

इकड हा वर्गात बसल्या बसल्याच दात ओठ खाई, आणि बाकाखालीं सोडलेला उजवा पाय जोराने हालवे जणु वर्गातल्या ह्याच्या ह्या झटक्याने ग्राउडवरचा माघार घेतलेला बॉल पुढे उडी घेणार होता ! शेवटी काय झाल कुणास ठाऊक, तो एकदम उठला; आणि काहीच न बोलता थेट ग्राउडवर धूम ठोकून तो त्या खेळणाऱ्यात जाऊन मिसळला, आणि गर्दी करून त्यान जेव्हा त्या दुसऱ्या बाजूवर गोल केला तेव्हा त्याच डोक एकदाच शात झाल ! सारेच जण आश्चर्याने त्याचेकडे पाहूं लागले. मॅट्रीकचा तर ह्यावेळीं तास, अन् ' दिनकर साठे ' ग्राउडवर आला तरी कसा ?....अन्

मग त्याचं त्याला स्वत ला देखील खजील झाल्यासारखं झालं. बिचारा मुकाट्यान वर्गात येऊन बसला !

इकडे वर्गात बसल्याबसल्या यशवंत त्याची ही सारी हाल-चाल पहात होता. तो बाहेर कशाकरिता घाईघाईने गेला हे मात्र प्रथम त्याला काहीं कळलं नाहीं. पण थोड्याच वेळात हे राजश्री ग्राऊंडवर स्वत: उतरून गोल करून पुन्हा ओशाळे होऊन वर्गात दाखल झाले आणि आपल्या त्या विक्षिप्तपणाकडं कोणाची नजर तर नाहींना ह्मणून चोरून पाहताना नेमकी यशवंतावरच त्यांची नजर गेली तेव्हा तर यशवंताला इतकं बेसुमार हसूं कोसळलं की शेवटीं ती गोष्ट हेडमास्तरपर्यंत गेली, अन् मग काय, वर्गात एकच हशा पिकला !

हे सारं त्या दिवशी शाळा सुटल्यावर यशवंतकडूनच आप-णाला कळलं. इतकं खेळाचं बेसुमार वेड स्वारीला जडलं होतं !

पण पुढे पुढे सामन्याचे दिवस जसजसे जवळ येऊ लागले तस-तसा दिनकर, का कोण जाणे, उदासीन दिसूं लागला. त्याचं कारण आपणालाच काय पण अगदी जिवश्चकंठश्च यशवंताला देखील कळलं नाहीं ”

त्याची विचारमालिका का कोण जाणे एकदम थांबली त्यांनीं समोर पाहिलं, अन् एकदम उद्गारले, – “ कसं काय यश-वंतराव, काय ह्मणतयं घोडं ? मैदानावर हाणलं पाहिजे आतां– उद्यां ! ”

इतका वेळ मास्तराच्या त्या समाधीकडे साश्चर्य दृष्टीने पहात राहिलेला यशवंत हळूंच उद्गारला, “ सर त्याची कशाला काळजी !

ह्या पहा, खासा अरबी पठ्ठा अगदीं फुरफुरतो आहे सारखा ! " असं ह्मणून त्यान हळूंच दिनकरच्या पाठीवर थाप मारली.

पण का कोण जाणे दिनकर जरा बावरल्या सारखा झाला खरा. त्याची नजर जमिनीकडे वळली. पण तसं कांहीं कोणाला दिसूं नये ह्मणून तो पुटपुटला — " पण ह्या खाशाची कांहीं यायची नाहीं सर ! "

पण हे बोलल्यावर त्याच त्यालाच वाटूं लागलं कीं जे झांकायचं पाहिलं, जे बोलायच आवरलं तेच तर नाहीं कांहीं बाहेर पडलं ! · ··· ····

सकाळीं साडेसात पासून स्पोर्ट्सला व्हायची होती सुरुवात, त्यामुळे त्या सबधीं बराच वेळ बोलण चाललं होत त्याच.

शेवटी शाळेची लॉरी सातला सकाळीं येणार त्यापूर्वीच त्यानीं तेथें जमावं अस ठरून ते तिघेही जाण्या करिता उठले.

रस्त्याच्या तोंडाशीच दिनकरची खोली होती. तो तिकडे वळला.

यशवंत आणि मास्तर पुढे निघाले.

दिनकरची ती अबोल वृत्ती पाहून मास्तरानाही थोडं आश्चर्य वाटलं. " कायरे यशवंत, " ते ह्मणाले, " हा दिनकर असा खिन्न व घुमा का दिसतो आजकाल ? एरव्ही कसा हुषार अन् हंसतमुख असायचा. क्रिकेटची यंदा त्याची तयारी पाहिलीस ना ? "

" सर, ते मला देखील एक कोडंच आहे. पण मला वाटतं, स्वभावाबरोबरच परिस्थितीनेहि तो अत्यत गरीब असावा. येथें खोलीवर तो एकटाच असतो. त्याचं कोणीच नाहीं इथं. "

यशवंता बरोबर मग मास्तराना देखील ते एक कोडंच पडलं.

रस्त्याच्या दुसऱ्या वळणावर मुलाचा एक ताडा त्याना भेटला.

" ओ हो ! करमळकर शास्त्री का ? " अरे तूं कुणीकडे हा ? उद्या सकाळी मैदान तुडवायचं ह्मणून सारी रात्र अशी डोक्या-वर घ्यायची वाटतं. लेका, तुह्मी चॅंपियन गडी असे निशाचर असाल हे कधीं नाहीं वाटलं मला. थाब उद्या संत मास्तराना " ..

पण खुद्द संत मास्तरानींच त्या बोलणाऱ्याच्या पाठीवर शाबा-सकी देत हसत हसत ह्मटल, " अरे, आताच दे सागून. कशाला उद्यावर ! "

संत मास्तर जरा अंधारात असल्यामुळे ते तेथे असतील असं त्याला वाटल नव्हतं. त्यामळे तो अगदीं खजील झाला.

पण तेवढ्यात दुसरा एक उद्गारला —

" हं, मग कस काय, यशवतराव, उद्या पडघम कीं वाजंत्री ? "

" दोन्हींही " दुसऱ्या एकान पुस्ती जोडली.

" अन् समज काही निराळच झालं तर ? " काहीं तरी-बोलायचं ह्मणून यशवत ह्मणाला

" वा ! अस्सच ह्मणून गेलीं दोन वर्षं बडवून घेतलंस; आतां हें उरलं सुरलं अखेरच वर्षहि पदरीं पडूं द्या ह्मणजे मिळविली. "

' बर रे, त्याचं त्यालाच काय विचारतोस ? तुझ्यासारख्या बाजारबुणग्याला मैदानावरचं नसलं तरी ' दुसऱ्याच्या जयाबद्दल

कौतुक ह्मणून ढोलक पिटण्याबद्दल ' मात्र एक स्पेशल मेडूल् देण्याकरिता यंदा मी जरूर शिफारस करीन ! "'

त्यावर एकच हंशा पिकला

त्या मनमोकळया विनोदामागे यशवंता–बद्दलचं दडलेलं गाढ मित्र-प्रेम पाहून संत मास्तराना अत्यंत समाधान झालं.

*　　*　　*　　*

बारावर रात्र झाली होती. बाहेर काळोख पसरला होता; अन् तो जास्तच दिसावा ह्मणूनच की काय म्युनिसिपालिटीचा एक दिवा गल्लीच्या तोंडाशीं मिणमिणत होता.

यशवंत नुकताच आडवा झालेला. दिवसभराच्या शारिरिक श्रमाने डोळ्यावर ग्लानी आलेली, पण मनात विचाराचं वादळ माजलेलं. उद्या काय व्हायच ? क्षणभर आत्मविश्वास राहिला बाजूला आणि एखाद्या ग्रुपफोटोग्राफ कडे पाहिल्यावर त्यातला प्रत्येक चेहरा पहाणाऱ्याकडेच दृष्टी रोखून पहात आहे असं वाटायला लागतं त्या प्रमाणे– माणसानं फुललेल ग्राउंड, तेथील स्कूलटेट मधून दृष्टी रोखून पहाणारीं सारी मुलं, त्यातल्यात्यांत संत मास्तर, ही शाळेची भव्य अन् शुभ्र इमारत, सारेच्या सारेच आपणाकडे कसे उत्कंठेने पहाताहेत असा त्याला भास होऊ लागला.

इतक्यात दारावर कोणी तरी थाप दिल्यासारखं त्याला वाटलं. विचाराची गति थांबली. क्षणमात्र त्याचे कान दाराकडे लागले.

पुन्हा हळूच एक थाप दारावर पडल्याचा त्याला भास झाला. त्यानं अंगावरची चादर पायानं दूर भिरकावली. चिमणीची वात जरा वर सारली, व हळूच तो दाराजवळ गेला. कापऱ्या हातानं त्यानं दाराची कडी हळूच काढली—

“ कोण दिनकर ! अन् ह्या वेळी ! ” त्याला अत्यंत आश्चर्य वाटलं.

“ ये ना असा आत. बाहेरच का ? ”

दिनकर हळूच आत शिरला व खाटेच्या एका कोपऱ्यावर त्यानं आपलं अंग टाकलं. त्याची दृष्टी सारखी पायाकडे होती. चेहऱ्यावर भीति व उदासीनता ह्याची संमिश्र छटा उमटली होती.

बराच वेळ झाला तो निर्जीव पुतळ्याप्रमाणंच स्तब्धच. यशवंताला काहींच बोध होईना; पण त्याच्या चेहऱ्यावरचा तो भाव—ते उदास अन् म्लान मुख पाहून त्याला गहींवरून आलं.

“ दिनू, दिनकर, काही होतं का तुला ? ”

तो काहींच बोलला नाहीं; प्रत्युत्तरादाखल त्यानं खिशातून एक लहानसं पत्र काढून त्याच्या हातात दिलं.

अधीरतेनेच त्या पत्रावरून त्याने डोळे फिरविले व एक दीर्घ उसासा टाकीत यशवंत ह्मणाला, मग काय, तुला पैशाची का अडचण आहे ? ”

“ छे रे ! ”

" मग तुझ्या मामाच्या ह्या लिहिण्याचा अर्थ काय ? "–

–" आता पावेतो जेवढं मला करायच तेवढं मीं केल, आता मात्र सगळं तुझ्या एकट्यावरच अवलबून आहे. तू आणि तुझ नशीब ! " 'माझ्या दृष्टीनं ह्याचा सरळ अर्थ, त्यानी तुला पैसे पाठवण बद केल असावं.

" नाही, रे " एवढ बोलून तो पुन्हा थाबला. त्याला आणखी काही तरी बोलायच असावं.

" मग, मी काय बर करू साग ? तू अस स्पष्ट काहीच जर बोलला नाहीस तर मी तरी काय समजाव बरं ? "—

दिनकरची चर्या अधिकच विलक्षण झाली.

" बोल, बोल, मी तुला वडील भावाप्रमाणे ना ? तुझी अडचण तशी का राहू देईन ? "

ते ऐकून दिनकरच्या डोळयात किंचित पाणी आलं; पण ते त्यानं आवरलं; अन् मनाचा थोडा निश्चय करून तो उद्‌गारला–

" हे असं पहा, माझे वडील होते आमच्या गावी शाळेत फिजीकल इन्स्ट्रक्टर. नुकतेच एक वर्षापूर्वी ते वारले. त्यामुळे माझ्यापुढं मोठाच प्रश्न उभा राहिला. माझं आधींपासून लक्ष होतं खेळ अन् तालमीकडे; त्यामुळे मॅट्रीक होताच वडिलामागे त्याच शाळेत माझं काहीं जुळावं ह्मणून मामानीं खटपट चालविली; आणि शेवटीं हेंहि सागून टाकलं की त्यानं निरनिराळया खेळात आणि चढाओढींत पुष्कळ नांव केल आहे आणि यदाच्या A. I. टूर्नामेंट्स् मध्येहि चॅंपियनशिप् मिळावायचा निश्चय करून त्यानं




…'पण स्वतःच्या ' नाटकाची ' आठवण होऊन तो परत खालीं बसला.

[ पृष्ठ ५२. ]

तेथील शाळेत नाव देखील दाखल केलं आहे. वडिलामागून हक्क ह्मणूनच नव्हें तर त्याचं कांहीं नाव राखायची संधी शाळेशीं संबंध आला तर, मिळेल असं त्याला वाटत. पहा कांहीं जमलं तर. ....... ”

“ 'त्यावर हेडमास्तरही येवढं ह्मणाले, “ बर बर, येऊं तर द्या त्याला मॅट्रीक अन् चॅंपियन होऊन. मग मला रेकमेंड तरी करता येईल त्याच नांव वर ”

“ 'इतक बोलून दिनकर एकदम थांबला. पुढे जे कांहीं सांगायच ते सांगायला त्याला धीर होईना.

यशवंताला त्याच्या त्या मामाच्या पत्राचा आतां बोध झाला; पण अजून ह्याला आपली मदत कशी पाहिजे ते त्याला कळेना; तो आपल्याच मनाशीं विचार करूं लागला.

कांहीं वेळानं दिनकरच उद्गारला, “ आज दोन दिवसांपासूनच माझ्या मनाची कशी सारखी तगमग होत आहे रे; तुला कसं विचारावं हेंच मला समजेना. पण आज शेवटीं अखेरचा क्षणच येऊन ठेपला. मग मात्र मनाचा निर्धारच करून आलों येथे. तुला राग तर नाहीं ना येणार, मी कांहीं भलतंच विचारलं तर ! ”

“ असं कां बरं वाटतं तुला आज ? ”

“ कसं सांगू ? तें ऐकल्यावर तूं मला क्षणभर देखील उभं करणार नाहींस जवळ. ”

“ वेडा आहेस तूं ”

दिनकरानं आपली दृष्टी फुटलेल्या तावदानातून कोठेतरी दूरवर स्थीर केली. हृदयाची धडधड जोराने होऊं नये म्हणून कीं काय छातीवर उजव्या हाताचा पंजा टेकला; आणि तो खालच्या मानेने म्हणाला, " यदाच्या सामन्यामधून तू आपलं नांव काढून घेतलस तर ? " यशवत एकदम चमकला;–पण क्षणमात्रच. डोळ्या - पुढं दिनकराची ती केविलवाणी मुद्रा नाचूं लागली आणि त्याच बरोबर स्वतःची खिलाडू वृत्तीहि एकदम जागृत झाली—

" वेड्या, येवढ्याचसाठी का तूं मनाला इतकं लावून घेतलस ! छे ! मला नाहीं वाटत तू हे काहीं भलत विचारलस. अरे, तूं शाळेच नाव केलं काय अन् मी केल काय, सारखच ! शाळा आपणा दोघाचीहि ना ? चल ऊठ; सकाळी लवकर उठायचं आहे. झोंप इथेंच आता. "

कधीच न अपेक्षिलेली ती अमृतवाणी दिनकरच्या कानावर पडली मात्र, त्याच्या डोळ्यातून घळघळ अश्रू ओघळूं लागले. दुसऱ्या क्षणीं याचक दृष्टीने एकदाच त्यानं यशवताकडे पाहिलं; त्याची मुद्रा कमालीची निर्विकार होती; तिच्यावर राग नव्हता, द्वेष नव्हता, तिरस्कारहि नव्हता.

तो एकदम उभा राहिला. त्याच्या मुखातून शद्ब बाहेर पडूं लागले " यशवत, तसं पाहिलं तर तुझ्यात अन् माझ्यात काय बरं अंतर ? माझ्या प्रमाणेच तुझ्या पितृहीन जीवनाचा भार बिचाऱ्या वृद्ध आईवरच आज पडला आहे ना ? उद्या शाळेनं तुला आपलं म्हणायचं जवळ जवळ ठरवून टाकलं आहे आणि त्याकडेच लागलेत

बिचारीचे सारखे डोळे. अशावेळीं मी निष्ठूर होऊन चालत आलो तुझं यश अन् पैसा, मला दे म्हटलं— तुला काय वाटत असेल! ··· कसा परिस्थितीचा दास बनलो रे मी ! ”

“ वेडा आहेस तूं ! असं झालं तर कदाचित् मला शाळेत जागा मिळेल; कदाचित् मिळणारहि नाहीं. पण जाऊं दे. मला संत मास्तरांचा आधार आहे. आज नाहीं, उद्या काहीं तरी पहातां येईल पुन्हा. ही कांहीं माझ्या आयुष्यातली अखेरचीच संधी आहे असं नाहीं; पण तुझं तसं नाहीं. तूं रहाणारा दूरचा ······ पण जाऊं दे. आता नकोच त्या गोष्टी. चल पाहूं निजायला. ”

“ नको; मला आता अगदी हलकं वाटतं; मी जातो खोली-वरच. ”

नाहीं नाहीं म्हणत असताहि स्वत: यशवंत त्याला त्याच्या खोलीवर पोहोचवून आला.

त्याने पुन्हा अंग टाकले; उद्या कसं वागायचं ते सरळ ठर-वून टाकलं; आणि डोळे मिटून तो निद्रादेवीची आराधना करूं लागला.

* * * *

रेसिडेन्सी ग्राउंडवर चिकार गर्दी लोटली होती. रेसेस सुरू होण्याची जो तो उत्सुकतेनें वाट पहात होता.

तोंच लाउडस्पीकरचा गंभीर नाद झाला.

विशिष्ट पोशाखांतील निरनिराळ्या शाळेचे गडी आपापल्या गटांतून टाळ्यांच्या कडकडाटांत मैदानावर जमूं लागले.

शाळेच्या तंबूतहि हालचाल दिसत होती. जाणाऱ्या गड्यांना संत मास्तर कांहींसे सांगत होते. पण त्यांच्या चेहऱ्यावर आज उत्सुकता नव्हती, आनंद नव्हता; पूर्ण उदासीनता पसरली होती. तें सारं त्यांच्याच शेजारीं गुडघ्याला बँडेज बांधलेल्या यशवंताच्या नजरेस पडलं. त्याला अत्यंत वाईट वाटलं.

दिनकर एकेक पाऊल टाकीत संथपणें इतर गड्यांबरोबर जात होता. यशवंताला क्षणमात्र वाटून गेलं—

– ठरल्याप्रमाणं साधलं तर शाळेचं नाव राहील; पण वेळेनेंच दगा दिला तर–तर ह्या संत मास्तराना काय वाटेल ? साऱ्यानाच काय वाटेल ? माझं दिनूचं कोणाचहि बरं नाहीं त्यात.

पण अधिक विचाराला अवसरच नव्हता.

शंभर यार्डांची दौड सुरू झाली, आणि लगेच संपलीहि.

कोण आनंदाची गोष्ट ! दिनकर सर्वांचे कितीतरी पुढें होता.

शाळेच्या तंबूतून बेसुमार टाळ्यांचा कडकडाट झाला. बँडचे दणदणीत सूर चौफेर मैदानभर घुमूं लागले.

यशवंत क्षणमात्र बेभान झाला अन् दिनकराची पाठ थोपटायला वळला देखील.

पण स्वत:च्या ‘ नाटकाची ’ आठवण होऊन तो परत खालीं बसला.

शाळेच्या तंबूतील ते आनंदाचं वातावरण अखेरपर्यंत तसंच टिकलं. चारशें चाळीस यार्डस् उंच उडी, लांब उडी, गोळाफेक ह्या साऱ्यांतच त्यानं चांगलंच नांव काढलं. शाळेच्या इतर गड्यांनींहि त्यांत थोडी फार भर टाकली.

सकाळचा कार्यक्रम तर पार पडला.

सर्वांनाच मोठा आनंद झाला.

घटकेपूर्वी माणसांनीं फुलून गेलेलं तें सारं पटांगण थोड्या वेळांतच रिकामं झालं.

अगदीं आदल्या रात्रीपर्यंत धडधाकट असलेला, वाजंत्री बँडच्या गोष्टी केलेला यशवंत—ज्यावर शाळेची सारीच भिस्त होती तो—दुसऱ्या दिवशीं सकाळींच जायबंदी होतो ह्याचं साऱ्यानाच मोठं नवल व वाईट वाटलं. हातांत आलेलं शाळेचं यश आतां कसचं लाभायचं ह्याच कल्पनानीं निराश झालेला प्रत्येक जण मैदानाकडं आला पण तोच पूर्वीचा आनंद, पूर्वीचं यश नव्यानेंच मिळल्याचं समाधान घेऊन प्रत्येक जण परतत होता.

संत मास्तर अत्यंत खुषींत होते.

येवढंच काय, स्वतः यशवंतहि अत्यंत आनंदित होता.

पण दिनकर ! त्याच्या भावना मात्र कोणालाच कळणाऱ्या नव्हत्या.

सकाळप्रमाणं दुपार देखील मोठ्या आनंदांत पार पडली.

दिनकराबरोबरच इतर दोघांचौघानीं मैदान गाजवलं.

* * *

परसांत दोन तीन आवडीचीं झाडं यशवंतानं लावली होतीं. त्यांच्या आसपास घासाचं नुसतं रान माजलं होतं तें सारं साफ करून त्या जागीं आईच्या आवडीचं एक तुळशी वृंदावन कसं तयार करतां येईल ह्याचा विचार करीत यशवंत उभा होता. इतक्यांत आईच तेथें आली. मग त्याचं बराच वेळ बोलणं होऊन तेथें एक वृंदावन अन् साधलं तर एक छोटंसं

कारंजं स्वतः करायचं त्यानं ठरवलं; आणि मग आई स्वयंपाकाला व तो शेजारीं ' नवाकाळ ' चाळायला निघून गेला.

अन् थोडयाच वेळांत तो येतो तों त्याला कळलं कीं दिनकराला सडकून ताप चढला असून तो बिछान्यावर पडला आहे आणि सारखी त्याचीच आठवण करीत आहे.

त्याला आश्चर्य वाटलं. कपडे करून तो झटकन बाहेर पडला.

रात्र कांहीं फार झाली नव्हती. असेल नवाचा सुमार. पण हवेंत विलक्षण गारठा आलेला. त्यान कोटाची कॉलर गळयाशीं घट्ट केली, आणि झपझप पावलं टाकीत तो पुढे चालूं लागला. रस्त्यात ओळखीचं असं भेटलं नाहीं कुणी. थोडीं फळं घ्यायला थांबावं लागलं त्याला तेवढंच.

खोलीचं दार उघडून तो आंत शिरला. दिनकर अस्ताव्यस्त पडला होता. त्याचे डोळे लालबुंद झाले होते आणि चेहरा निस्तेज दिसत होता.

यशवंताच्या ' तें सारं ' लक्षात आलं.

" वा महाराज ! आपण बरोबरच नाहीं का आलों सारे संध्याकाळीं ? मला वाटलं, तूं तर लेका यावेळीं उडवत असशील मेवा मिठाई, चहा, चिवडा साऱ्यांबरोबर. अन् हे काय भलतंच आठवलं बुवा तुला ! "

" येशा, येशा, कितीरे वहावत चाललास तूं ! तुला घरीं जबरीनं खोल्यात अडकवून मी एकटाच मजा मारीन असं तुला वाटलं तरी कसं ? सकाळपासून कससंच होतंय मला. फार मोठं

पाप हातून घडलं असं काहीं तरी सारख बोचत आहे. तुला मिळा-यचं सुख, आनंद, मान मी मिळवायचा ठरवला अन् तेहि तुला सोडून — नव्हे तुला— जायबंदी झाल्याचं ढोंग करायला लावून; का तर तुझ्यापुढे माझं काहीं चाला-यंच नाही म्हणून ... ... ! मला यश मिळालं; साऱ्याना आनंद झाला; मला देखील झाला. पण ते मिळे पावेतोच. मग मात्र काय झालं कुणास ठाऊक. साऱ्यांकडून होणारं माझं अभिनंदन विंचवाच्या नांग्याप्रमाणं झोंबू लागलं. ते माझं अभिनंदन नव्हतं, तुझं होतं. मनाला कसं डांचत होतं सारखं. मी काल तुझ्याशीं किती निष्ठू-रतेनं वागलो रे ! अन् स्वतःच्या मनाशीं कशी प्रतारणा करून घेत-लीहि ? हा पडलो आहेना असा, ह्याला दुसर काहीं नाहीं बरं; दिव-सभर कोंडून ठेवलेलं सारं बाहेर पडतंय. अगदीं असह्य झालं ह्मणूनच पाठविला तुला निरोप. क्षमा करशील का तूं मला ? अन् काल जसं माझं ह्मणणं ऐकून घेतलंस तसं ह्या घटकेला— एक ऐकशील का जरा ? उद्या मी नाही जायचा — तूंच जा. जाशील ना ? ”

त्याला मुळीच न अडवता संथपणें त्याचं बडबडणं यशवं-तानं ऐकून घेतलं. पण शेवटचं वाक्य ऐकून तो क्षणमात्र चमक-लाच.

“ किती खुळा आहेस तूं दिनू ! अरे ह्या पद्म पाहिलास ना ! “ सोंग आणलं तसं पुरं नको का पाडायला ! ”

“ मग तूं अस्संच मारणार कां मला आता ? ”

“ चल तुला वेड तर नाहीं लागलं ' अन् नसेल लागलं तर लागायचं उगीच आता. ” असं ह्मणून यशवंतानें त्याला बळंच

उठवलं; तांब्यातल्या पाण्यानें चूळ भरायला लाविली. जवळचीं थोडीं फळं आपल्याबरोबर त्याला खायला घातलीं, आणि खुंटीवरची टोपी त्याच्या डोक्यावर ठेवून दारावरचा मफलर त्याच्या गळ्याशीं लपेटला आणि त्याला पुढे केलं.

" हं आणखी उरलंय का कांही दिनू ? "

बिचारा दिनकर काय बोलणार त्यावर ! निमूटपणे त्याच्या-बरोबर तो पाऊल टाकू लागला. यशवंताचे मनात विचार उसळत होते.—" केवढा फरक पडला हा त्याच्यात एका दिवसांत ! एखाद्या अत्यंत निर्मळ पण भावनाप्रधान माणसानं विकारवश होऊन थोडं वाईट करायच ठरवल तरी देखील त्याच्या हातून ते कांही नटिसं व्हायचं नाहीं असं म्हणतात हेच खरं. कसा भाबडा आहे हा दिनू ! त्याच्या दृष्टीनं हा उपरतीचा क्षण असेल, पण त्याला मिळालेलं अर्ध मुर्ध यश आपण पुर मिळूं दिलं पाहिजे आता ... "

बाहेरच्या शीतल वातावरणामुळे दिनकराचं भडकलेलं डोकं शांत झालं. त्याच्या मनाला थोडा उल्हास वाटू लागला.

बराच वेळ फिरल्यावर यशवंताने त्याला आपल्या घरीं नेलं आणि बळंच आग्रह करून जेवायलाच ठेवून घेतलं.

गप्पागोष्टींत जेवण झालं. यशवंताला दिनकराच्या मनांतून सारंच विसरायला लावायचं होतं. म्हणून झोंपायला देखील त्यानें त्याला आग्रह करून थांबवून घेतलं.

झोंपण्यापूर्वी मात्र दिनकर म्हणाला, " येशा, मी माझा

सारा गाढवपणा सागीन मास्तरांना. पण तूं मात्र जा सकाळीं; मी नाही जायचा यापुढे. ”

“ बरं पण ह्मणतो कोण लेका तुला जा ह्मणून. नीज पाहूं मुकाट्यानं आता. ”

पण सकाळ झाली, आणि यशवंतानं मुद्दाम बोलावून ठेवलेली शाळेची लॅारी दाराशीं येऊन ठेपली. तिच्यात मुलाबरोबरच स्वतः संत मास्तरहि बसले होते.

अधिक वेळ लागला तर हा काहींतरी बोलून घोटाळा करायचा. ह्मणून सरळ यशवत ह्मणाला, “ ह दिनू चढव पाहूं पोषाख ”

इतक्या तातडीनं सारं कांहीं घडून येईल असं दिनकराला वाटलं नव्हतं. समोर संत मास्तर अन् इकडे यशवंत !

“ मी जाणार नाहीं; तूं जाणार होतास ना ! थाब मीच आता सारं सागतो संत मास्तराना. ” त्यानं पाऊल उचललं. –

“ कुठे चाललास ? ” यशवत थोड्या अधिकार वाणीन उद्गारला. त्याच्या नजरेला दिनकरची नजर थाबली नाही. त्याच्या उदार मनाचा दिनकराच्या मनावर एवढा विलक्षण परिणाम घडून आला होता कीं एखाद्या काळसूत्री भावल्याप्रमाणं तो लॅारींत चढला.

“ आणि तूं रे, यशवंत ? ” मास्तरानीं विचारलं.

“ सर माझा पाय जरा जास्तच ठणकतो आहे; राहूं द्याना जरा ? ”

“ बरं तर ” ते हळूंच उद्गारले.

यशवंतान जायचं मुद्दामच टाळलं; उगीच वेळेवर मघासारखा दिनू बिथरायला नको.

लॉरी दृष्टी पथातून गेल्यावर त्याचा जीव खालीं पडला. तो आत गेला. त्या विषयावर अगदीं विचार करायचा नाहीं असं त्यानं मनाशीं ठरवून टाकलं.

## ५.

आज किती तरी दिवसात त्यान मागील अंगणाकडे लक्ष दिल नव्हत. त्यामुळे गवत इतके बेसुमार वाढलें होते कीं सारीं लहान सहान रोपं अगदीं खुरटून गेली होती. हळूं हळू त्यानं सारं स्वच्छ केल. त्या रोपाभोवतीं कौला विटाच्या पाळी बांधल्या; आणि केळी पोपयाची वाढ खुंटवणारीं पानं तोडून टाकली.

इतकं होईतो सूर्य अगदीं माध्यानी आला. त्यानं काम थांबविलं आणि तो क्षणभर दारात येऊन उभा राहिला. जागा लहानशीच; पण स्वच्छ होताच केवढी मोकळी दिसूं लागली. आता राहिलेलं वृंदावनाचं काम मग करता येईल असा विचार करीत तो घरात आला. पाय धुतले, आणि आईने करून ठेवलेला पिठलं—भात त्यानं चापला. मग मात्र त्याला थकल्यासारखं वाटूं लागलं डोळ्यावर ग्लानी चढली. त्यानं सहज जरा पाय लांब केले. आणि थोड्याच वेळांत त्याला गाढ झोप लागली.

सुमारें पांच साडेपांचचा सुमार असेल. ऊन किती तरी कमी झालेलं. पण यशवंत अद्याप निद्रामग्नच. तो आधींच थकलेला; त्यांतून जरा पायाचं बरं नाहीं ह्मणून आईनेहि त्याला उठवलं नव्हतं. इतक्यांत मोटारीची घरघर ऐकून ती बाहेर आली. शाळेची लॉरी

नुकतीच येऊन उभी राहिली होती. तिच्यांतून दिनकर वगैरे मंडळी-सह संत मास्तर खालीं उतरले. सारेच कसे आनंदी अन् प्रफुल्ल दिसत होते.

"काय काकू, काय चाललंय राजश्रींचं?" दिनकराने हंसत हंसत विचारलं.

"अरे, पायाची मलमपट्टी!" दुसरा कोणी एक खट्याळपणें उद्‌गारला.

"नाहीं रे, जरा बरं नव्हतं त्याला अन् मी नको नको ह्मणत असताही मागील सारं अंगण स्वच्छ केलं त्यानं आज; आता जरा डोळा लागला आहे; उठेलच इतक्यात. पण या, ना सारे आत. अन् ह्मटलं मास्तर, आपणहि आज गरीबाच्या घरीं पायधूळ झाडलीत ह्मणायची."

संत मास्तरांना पुष्कळ बोलायचं होतं ह्मणूनच काय ते यावेळीं कांहींच बोलले नाहींत.

यशवंत गाढ निद्रेत होता. दिनकराने मागील अंगणांत एक जाजम टाकलं. आणि मग तेथेच सारी मंडळी बसलीं.

लिंबाचं सरबत वाट्यात ओततांना काकूंची नजर दिनकराने नुकत्याच फरशीवर ठेवलेल्या लखलखणाऱ्या चांदीच्या प्याल्यावर आणि पदकावर गेली; त्यांना जरा आश्चर्य वाटलं.

"काय मास्तर, हे लढाई आधींच कुठून मिळवलत? दरवर्षी प्रमाणं खेळ कीं काय ते व्हायचे असतील ना?"

त्या 'रेसिस' 'फिसिस', अन् 'मॅचेस' मध्ये तिला कांहीं कळत नसलं तरी तिला आपलं वाटल असावं, असल्या

सुंदर मोठ्या थोरल्या पेल्यावरचा हक्क आपल्या येशाचा; अन् तो तर घरीं पडलाय गुडघाभर पट्टी बांधून.

मास्तरांना किती विलक्षण वाटला तो काकूंचा प्रश्न ! मागील दोन तीन वर्षांचे सारे प्रसंग त्याच्या डोळ्यांपुढून झरझर निघून गेले, आणि नुकताच दुपारचा प्रसंगहि डोळ्यांपुढे उभा राहिला.—

—दुपारीं फायनल स्पोर्टस झाल्यानंतर 'प्राइज्-डिस्ट्री-ब्युशन' झालं. ह्याहि वर्षी यश मिळवून मागचा मान शाळेनं टिकविला. साऱ्यानाच कोण आनंद ! ···

·· मैदानावर प्रचंड गर्दी लोटली होती. शाळेच्या जमावात कोण धावपळ ! आपण चादीचा पेला घ्यायला दिनकराला पाठविलं. टाळ्यांच्या कडकडाटाबरोबर त्याच्या हृदयाचे ठोकेही जोरजोराने पडूं लागले. तो पेला घेताना त्याचे हात थरथरत होते. डोळ्यांपुढें अंधारी आल्यासारखं झालं होतं; शेवटीं आपल्या हातात तो देताना त्याला गहिंवरून आलं.—

"सर · " अन् भावनेच्या भरात त्यानं आपलं सारं मन मोकळं करून टाकलं.

साऱ्यांचीच आतां पावेतों समजूत—" नको त्याच वेळीं दुर्दैवानं यशवंत जायबंदी झाला; पण अशा वेळीं दिनकरानं आपल्या हुषारीनं शाळेला केवढं यश मिळवून दिलं !" ····

····यशवंताच्या औदार्याची, त्यागाची पार्श्वभूमि येवढी मोठी असेल असं कोणाला तरी वाटलं असेल काय !····· ··

····यशवंत, यशवंत ! खराच तूं 'यश' वंतच ! ···· आपल्यालाहि मग गहिंवरून आलं ···

····अन् मग सारींच मंडळी त्याच्याकडे निघालीं—

ते दुपारचं--नव्हे नुकतंच—घडलेलं दृश्य समोर पुन्हां घडत आहे कीं काय असा मास्तराना भास होऊं लागला.

अन् मग त्यांना मोठाच प्रश्न पडला.

' हा पेला मिळवायला दिनकरान मैदान तुडवल हे खरं; पण तो मान आपण होऊन सोडायचं धैर्य, स्वार्थत्याग ह्याचं केवढं दिव्य यशवंतानं केलं होतं हे काकूंना कसं पटवून द्यायचं ? '

इतक्यात दिनकर हळूंच खोलींत गेला. अन् यशवंताच्या पायांचा पट्टा अलगद हाताने सोडून तो हंसत हंसत बाहेर आला आणि उद्गारला " काय काकू, येशाचा पाय, ह्मटलं, साफ बरा झालेला दिसतो ? "

त्या घरांत गेल्या, अन् परत पावलींच माघारीं वळल्या.

" अन् हे रे काय आणखी गौडबंगाल ? " त्यांना अत्यंत आश्चर्य वाटलं !

हीं संधी बरी आहे असं पाहून मास्तरांनीं खरी परिस्थिति त्यांना सांगून टाकली.

" काय केलं हे यशवंतान ! " क्षणमात्र काकूंच्या डोळ्यात अश्रु चमकले. इतक्या दिवसांच्या त्याच्या आशावर पाणी फिरवलं होतं त्यानं !

मान खालीं घालून जवळच दिनकर उभा होता. तें सारं अनावर होऊन त्याला हुंदका आवरेना –

" काकू, काकू, मला क्षमा कराल काहो ? यशवंताच्या मोठेपणाचा, चांगुलपणाचा मी ···· ··· ! "

मग मात्र काकूंनाही वाईट वाटलं. अन् त्याचबरोबर त्या दोघांचं प्रेम—गाढ प्रेम—त्याच्या दृष्टी समोर उभं राहिलं. —

“ चल, वेडा कुठला ! जसा येशा तसाच मला तूं. जाऊं दे. योगायोग असेल तसंच घडतं; त्याला मनुष्य काय करितो ! येशानं जें केलं तें मुळींच बावगं केलं नाहीं अन् तो करणारहि नाहीं. माझ्या बाईल बुद्धीला, मेलं, क्षणभर वाटलं आधीं; पण तुला नको काहीं इतकं वाईट वाटायला हो. बरं चल, हे घे. अन् मास्तर घ्या, ना हें उरलेलं सरबत साऱ्यानाच. कसं थंड वाटेल त्यानं. ”

“ तरीच ! कळलं आता यशवंतानं येवढा उदारपणा कुठून चोरला, ते ! ” अन् ह्या विचाराबरोबर मास्तराचे चेहऱ्यावर स्मिताची झांक चमकली.

अन् तितक्यात समोर डोळे चोळत येणाऱ्या यशवंतावर डोळे रोखत ते ह्मणाले, —

“ काय यशवंतराव, झाली का झोप ? पाय काय ह्मणतोय ? ”

यशवंतानं आपल्या पायाकडं पाहिलं अन् तो एकदम ओशाळला ! मास्तर जवळ आले आणि त्यांनीं त्याच्या पाठीवरून हळूच हात फिरविला; अन् हंसत हंसत ते म्हणाले, “ जाऊ दे रे यशवंत, इतकं नको काहीं लाजायला, लवकर पाय बरा झाला ह्मणून. ते जातीवंत खेळाडूचे पाय आहेत. अन् अजून त्यांना उद्यांपासून ‘ मॅचेस ’ जिंकायच्या आहेत. खरं कीं नाहीं ? ’ अन् इतकं झाल्यावर किंचित् हंसून ते साऱ्यांनाच उद्गारले, “ एक, हा यशवंत जों पर्यंत शाळेंत आहे तों पर्यंत शाळेचं यश शाळेजवळच राहील असं मी नेहमीं ह्मणायचा ते खरं कीं नाहीं ते ! आतांपर्यंत

त्यान ते खेळून मिळवलं; आणि आज आपल्या मनाचं मोठं औदार्य दाखवून ते मिळविलं ! "

यशवंत अधिकच लाजल्या सारखा झाला.

जवळच दिनकर उभा होता. त्याच्या हातातला तो पेला कसा लखलख करीत होता ! मास्तराचे ते उद्गार ऐकून त्याचे चेहऱ्यावर आनंद उसळून आला. अन् त्यानं सहज यशवंताकडे दृष्टी टाकली.

अन् त्याच वेळीं यशवतानेहि त्याचेकडे पाहिलं.

दोघांचेहि चेहऱ्यावर एकदम स्मिताची झांक उमटली.

दिनकराच्या हातातला तो पेला बघण्याकरिता काकू जवळ आल्या, तो त्याना हंसूंच कोसळले !

त्या लखलखणाऱ्या पेल्यात त्या दोघाचहि प्रतिबिंब कसं आनंदपूर्ण हास्याने चमकत होतं !

# आगपेट्या विकणारी गरीब पोर !

**विचारी गरीब पोर ! गरिबीमुळें लोकांच्या नजरेंतून उतरून थंडीनें गारठून गेली, पण ह्मणून कां निसर्गानें तिला आपल्या ऊबदार पांघरूणाखाली हंळूच झांकून घेतलं ?**

डिसेंबर महिन्याचा शेवटचा दिवस. थंडी ह्मणते मी. वरून सारखा हिमवर्षाव चाललेला. आणि ऐन संध्याकाळ झाल्यामुळे जिकडेतिकडे दाट काळोख पसरूं लागला.

असल्या त्या कडाक्याच्या थंडींत अन् दाट काळोखात एक लहान पोर अनवाणीच रस्त्यावरून भटकत होती. घरून निघताना तिच्या पायात कोणत्याशा चपला होत्या हे खरे. पण तसे पाहिले तर त्याचा तिला विशेषसा उपयोगहि नव्हता; कारण एक तर त्या मूळच्या तिच्या आईच्या पायाच्या; तेव्हां हिच्या त्या इवल्याशा पावलांना असून नसून सारख्याच. अन् शिवाय आता त्यांचा तरी पत्ता होता कोठे ? बिचारी गरीब पोर ! अमोरासमोरून येणाऱ्या दोन भरधांव गाड्यांना चुकविण्याच्या ऐन धांदली धांदलींत पायातून त्या कशा अन् केव्हां निसटल्या कोण जाणे ! एकीचा तर पत्ताच

लागेना. अन् दुसरी एका खट्याळ पोराच्या हातात पडली, त्या बरोबर तो तिला वेडावीत ह्मणतो कसा, " ओहो ! बरी सांपडली ! मी मोठा झाल्यावर होईल बर का माझ्या बबड्याला छानदार झोपायला. " अन् इतकं बोलून तो जो धूम ठोकून पळाला, तो क्षणात अगदीं दिसेनासा. मग काय करते बिचारी !

तिची ती कोवळीं कोवळीं पाउले गारठून अगदीं हिरवी निळीं पडलीं होतीं. पण तशा केविलवाण्या स्थितीतहि ती कशीतरी एकएक पाऊल टाकीत टाकीत चालली होती. आपल्या फाटलेल्या झग्यात तिने आगपेट्याचे पुडे कोंबले असून त्यातलाच एक पुडा तिनें आपल्या हातात धरला होता. पहाटेपासून आतापावेतो वणवण भटकून आगपेटी विकून एखादी दिडकी देखील तिच्या पदरांत पडली असेल तर शपथ !

पण बिचारी करते काय ! कशीतरी पाउले सांवरीत मोठ्या कष्टाने चालत होती. थंडीने सारे शरीर गारठून कापरे भरले होते; आणि पोटात भुकेने असह्य वेदना होत होत्या. हायहाय ! जणुं चालतें बोलते मूर्तिमत दारिद्र्याचे चित्रच ते !

अनाथ पोर !

तिच्या मानेवरील कुरळे कुरळे केसाचे झुपके यावेळीं हिमकणानीं अगदीं भरून गेले होते; पण त्यांकडे तिचे लक्ष तरी होते कुठें ! ती आपली सारखी पावलाना गति देत होती.

रस्त्याला लागूनच असलेल्या भव्य इमारतींच्या तावदानातून दिव्याचा झगझगाट बाहेर पडत होता. आणि नूतन वर्षासाठीं तयार

होत असलेल्या खमंग अन् खुसखुशीत पक्वानाचा मधुर घमघमाट सर्व वातावरणात दरवळत होता.

आता मात्र तिला आपले मन आवरेच ना.

शेवटी दोन घरापैकीं एक बरेच पुढे आल्यामुळे आपोआप झालेल्या घराच्या कोपऱ्यातच तिने बसकण घेतली. तिचे सारे शरीर अगदीं गारठून गेल्यामुळे हुडहुडी भरून सारी गात्रे बधिर झाल्यासारखी झाली होतीं. आपल्या अनवाणी पावलाना थोडा तरी उबारा यावा ह्मणून तिने त्याना आपल्या पोटाशी घट्ट आवळून धरिले. पण काय! थंडी ह्मणून राहीच ना. आजच्या इतकी विलक्षण कडाक्याची थंडी बिचारीला साऱ्या जन्मात ठाऊक नव्हती कधीं. पण ह्मणून घरीं जायचा धीर तरी कसा व्हावा तिला? कारण अवघी दिडकीहि पडली नव्हती तिच्या पदरात घरी न्यायला. अशा स्थितींत जर ती घरीं जातीच तर तिच्या खाष्ट बापानें खास झोडपूनच काढले असते तिला. अन् बरे घर! घर तरी असे काय होते? निव्वळ वर आधाराला छप्पर अन् तेहि चंद्रमौली! गार गार वारा त्यांतून नेहमीं रो रो करी. त्यातली मोठमोठालीं भगदाडे मात्र काय तीं चिंध्या अन् वाळक्या गवताने ठोसून बंद केलीं होती एवढेच....

इतक्यात कसलीशी चाहूल कानीं पडल्यामुळें की काय तिनें आपली चंचल दृष्टी समोवतालीं भिरी भिरी फिरवली; आणि अग मोकळें केल्यासारखे केले. पण बधिर झालेले हातपाय जागचे हालेचनात.

त्या तसल्या कडाक्याच्या थडींत, त्या कोवळ्या जिवाची हालचाल बंद पडल्यास नवल काय ?

अररे ! अशावेळीं बिचारीने जवळच्या पुड्यातील एखादीहि काडी काढून भिंतीवर ओढली असती आणि त्या इवल्याशा गारठलेल्या बोटाना जरासा उबारा दिला असता तर ······· !

अखेरीस तिने काढलीच एक काडी पुड्यांतून अन् ओढली भरकन भिंतीवर त्याबरोबर काय पण छानदार उजेड पडला एकदम ! जणुं एखादी मेणबत्तीच ! तिने झटकन आपले चिमुकले हात तिच्यावर धरले. तसे पाहिले तर एका काडीची उष्णता ती कसली ! पण तेवढ्यानेच तिला वाटले की जणू काहीं आपण मोठ्या थोरल्या शेगडीजवळ शेकत आहोत, आणि असा काही मजेदार शेक लागत आहे कीं वारे वा ! आणि ह्मणून त्या वेड्या पोरीने आपले पाय सुद्धा त्या एवढ्याशा जाळावर धरले. पण काय ! निव्वळ सारा क्षणाचा भास. कुठली शेगडी आणि कुठला शेक ! नुसत्या अर्ध्या मुर्ध्या जळक्या काडीचे थोटूक मात्र राहिले होतें हातात !

तिने पुन्हा आणखी एक काडी ओढली; आणि काय मजा पहा ! तिला वाटले, – आपण एका खूपच मोठ्या आणि छानदार " ख्रिसमस " झाडाखालीं बसलो आहोत — बिचारीनें सगळ्या जन्मांत कधीं काळीं एकदां बाहेरील तावदानांतून एका श्रीमंत शेटाकडे पाहिले होते तसले एक झाड; पण ते देखील इतके उंच अन् छान सजविलेले नव्हते. झाडाच्या हिरव्यागार फांद्यामधून हजारों लहान लहान दिवे लुकलुकत होते. झाडावरचीं सारीं सुंदर सुंदर

अन् हंसरीं चित्रे आपणाकडे अगदी टक लावून पाहाताहेतसा तिला भास झाला.

पण आतां ती दुसरी काडीहि पार विझून गेली !

बालमनातील ती कल्पना ! प्रकाश गेला ह्मणून झरक्यासरशीं कल्पनामूर्ती थोडीच नाहींशी होणार ! झाडातील मघाचे दिवे तिला आतां खूप उंच वरवर चढताना दिसूं लागले. शेवटीं तर ते इतके उंच गेले कीं जणुं आकाशांत लुकलुकणारे तारेच !

इतक्यात काय झाले कोणास ठाऊक. त्यातला एक तारा अकस्मात निखळला, आणि त्याबरोबर प्रकाशाची एक तेज:पुंज तिरीप तिच्या डोळ्यापुढे लख्खकन् चकाकली.

त्याबरोबर तिच्या मनात झटकन एक विचार आला —

" कोणी तरी देवबाप्पाच्या घरीं जात असेल बर कां "—

ह्या पोरीला जीव कीं प्राण करणारी तिची एक म्हातारी आजी होती. ती जिवंत असतांना तिनें ह्या पोरीला सहज गमतीने सांगितले होते कीं, – " बाळ, आकाशातील एखादा तारा तुटला कीं खास समजावं, कोणीतरी देवबाप्पाच्या घरीं चालल‌ं आहे. "

– ह्या कल्पनेबरोबर तिने पुन्हा एकदां भिंतीवर आणखी एक काडी ओढली. त्या बरोबर पुन्हा एकदा सर्वदूर लख्ख प्रकाश पडला, त्या लखलखाटात तिला आपल्या आजीची छायाकृति स्पष्ट दिसूं लागली. त्या आकृतीच्या चेहऱ्यावर खऱ्या आजीचा शातपणा आणि प्रेमळपणा पूर्ण भरलेला दिसत होता.

" आजी ग " त्या आकृतीकडे पहात ती बेभानपणे ओरडली, " मला घेग तुझ्याजवळ. समजले हं मीं; तूं देखिल मघाच्या

त्या मोठ्या थोरल्या शेगडी सारखी अन् त्या उंच उंच झाडासारखी नाहींशी होणार. पण थांब हं – "; आणि असे ह्मणून जणुं आपल्या लाडक्या आजीला घट्ट धरून ठेवण्यासाठींच कीं काय झट-कन तिने तो सबंध पुडाचा पुडाच शिलगावून दिला.

त्याबरोबर जणुं ऐन दुपार असावी असा लखलखाट सर्वदूर पसरला ! त्या शुभ्र प्रभेत तिला आपली आजी इतकी कांहीं सुंदर अन् तेजस्वी दिसली कीं अशी तिला ती पूर्वीं कधींच दिसली नव्हती. त्या म्हातारीने आपल्या लाडक्या बाळीला झटकन् पुढे येऊन हृदयाशी घट्ट धरले. आणि मग दोघीहि हसत हंसत मोठय आनंदाने आकाशमार्गाने खूप उच दिसेनाशा झाल्या.

ज्या स्थानी त्या जाऊन पोहोचल्या ते स्थळ मानवी शक्तीला आणि दृष्टीला पूर्ण अगम्य होते · !

* * * *

पहाट झाली.

जाणारा येणाराना भिंतीला टेकलेली एक तेजस्वी अन् हंसत-मुख पुतळी दृष्टीस पडली. गेल्या रात्री हिम-बर्फाच्या अतिवृष्टीमुळे एक बिचारा कोवळा जीव गारठून कायमचा थड झाला होता.

तिच्या त्या कोंवळ्या लुसलुशीत शरीरावर मृत्यूचा ताठरपणा आला असला तरी आपल्या झग्यात आगपेट्याचे पुडे तिनें छातीशीं घट्ट आवळून धरिले होते. त्यातील एक पुडा मात्र तिच्या पायाशीं जळून खाक झालेला दिसत होता.

जाणारे येणारे तिच्या त्या मूर्तीकडे पाहून ह्मणत, —

" पहा हो, गरीब बिचारी शेकायला कशी धडपड करीत होती ती ! "

बहिर्मुख प्रवृत्तिपर लोकांच्या तोंडून याशिवाय आणखी दुसरे ते उद्गार काय निघणार ! परन्तु रात्रीं तिला ज्या सुंदर सुंदर वस्तूंचें दर्शन झालें होते आणि त्यानंतर नूतन वर्षाच्या गाढ आनंदांत ती अगदीं रंगून गेली होती त्याचे कोणाला स्वप्न तरी पडले असेल काय !

एका इंग्रजी गोष्टीचा, मुळात थोडा फरक करून अनुवाद

# विधिलिखित…!

शालेय आयुष्यांतील माझ्या एका बाळ-मित्राची हकीकत मी सांगणार आहे. तिच्यामुळें तुमच्या आनंदाचा क्षणभर विरस देखील व्हायचा.

पण त्याच्या दुर्दैवाबद्दल थोडी सहानुभूतीहि तुह्मी दाखविणार नाही का?

---

माझ्या आयुष्यांतील तो दिवस मी कधींतरी विसरेन काय! त्याची आठवण होतांच जिवाचा कसा पण थरकांप होतो!

श्रावणातल्या जोरदार सरी नुकत्याच थाबल्या होत्या. जिकडे तिकडे हिरवेगार दिसत होते. मधून मधून खांच खळगे पाण्यानें भरून गेल्यामुळे चालतांना सहज फसगत होई. पण अशा रम्य वातावरणांत कोणालाहि अंमळ फिरून यावेसे वाटेच.

नुकतीच आमची शाळा सुटली होती. एरव्हीं रविवार ह्मणजे कोण आनंदाचा दिवस! अन् तशांतून 'उद्यांचा' रविवार तर

फारच मौजेचा ! कारण जवळच्या १५-१६ मैलावर असलेल्या धबधब्याची सफर शाळेनं ठरविली होती. आमच गाव लहान असलं तरी सुदैवानं छोटं का होईना पण तेथे एक रेलवे स्टेशन होतं. गाडी मात्र अवघी दोन तीन मिनिटेच थाबे.

कोण तो त्या वेळचा आनंद ! जो तो मोठ्या आनंदानं घरी निघाला होता. माझ्याबरोबर नित्याप्रमाणे जोशांचा जया होता. आज नाहीं ह्मटलं तरी खंडापासून मराठी सातवी पावेतो ह्मणजे गेल्या सात आठ वर्षांचं आयुष्य मोठ्या आनंदानं आह्मी एकमेकाच्या सहवासात काढलं होतं. उद्या पुढील शिक्षणाकरिता कोणकोणत्या शहरीं जाणार ते काय सागता आलं असतं ? अन् मनुष्यानं उद्याची काळजी वाहून तरी काय व्हायचं असतं !

घराची पायरी चढतांच आईनं हंसतमुखान आमच स्वागत केल. मला वाटतं आह्मी येण्यापूर्वींच तिला आमचा ' उद्याचा ' बेत कळला असावा. कारण आह्मी आत पाऊल टाकताच ती हंसत हंसत ह्मणते कशी, " चला, बरं झालं; उद्यां लिढूचा वाढदिवस; एका माणसाच्या नावाची पुरी बांसुदी वाचली ह्मणायची ! "

तिचा माझ्यावरील रोख ओळखून मीहि खट्याळपणे उद्गारलो, " मग झालं काय त्यांत ? सायंकाळीं परत आल्यावर दोन्ही वेळची कसर काढीन कीं एकदम ! "

पण मुलगा कितीहि खट्याळ असला अन् क्षणभर आईनं उसनं अवसान आणलं तरी, आई ती आईच ! उद्या भाऊ घरीं रहायचा नाहीं ह्मणून नुकतीच तयार करून ठेवलेली बासुंदी ती घेऊनहि आली, आणि ती खालीं ठेवता ठेवतां जयाला ह्मणाली,

" जया, तूं देखील ये हो संध्याकाळीं भाऊच्या पंक्तीला इकडंच पुरी बासुंदीचा समाचार घ्यायला. "

" वा काकू, झालं हे थोडंच झालं वाटतं! " जया थोडं लाजत म्हणाला.

त्या नंतर थोडा वेळ गुलगुल गोष्टी करून व सकाळीं लवकरच येण्याचं आश्वासन देऊन तो घरीं निघून गेला.

२.

**ती** पहाटेची रम्य वेळ! जो तो किती उत्कंठेनं गाडीची प्रतिक्षा करीत होता! शालेय आयुष्यात असले प्रसंग किती आनंदाचे असतात! मनाला कोण उल्हास असतो; जगाकडे बघण्याची दृष्टी किती बेफिकिरीची असते!

इतक्यांत जिची आह्मी इतका वेळ प्रतीक्षा करीत होतों ती गाडी आली एकदाची धाड्धाड करीत. आह्मी सारे चढलो भराभर तिच्यांत. अन् नशीब कीं आमच्यापैकीं कोणाला न वगळता मगच तिनं मुक्काम हलविला जागचा.

वाटेंत कोणी किती थट्टा केली, कशा गप्पा मारल्या, किती मनोराज्यें रंगविलीं हे सारं सांगण्यासारखं असलं तरी मला आज तें कांहीं आठवत नाहीं. पण येवढं खरं कीं स्टेशनावर उतरल्यावर मात्र धबधब्यापासून बऱ्याच अंतरावर जी एक टेकडी उभी होती तिच्यावरील एका टुमदार बंगलेवजा घरातच सर्वांनीं आपापलं बाडबिस्तर ठोकलं. अन् नंतर धबधब्याच्या दिशेनं मोर्चा वळविला.

पहाटेची प्रशांत वेळ; मधूनच कोठें रानपांखरांचा मृदुमंजुळ

किलबिलाट उठे तेवढाच. वायुलहरी मंद मंद वहात होत्या; अन् त्याबरोबर मनाचा उल्हासहि सारखा वाढत होता.

समोर हिरव्या रंगाच्या विविध छटानीं सारं रान भरून गेल होतं. टेकडीच्या उतरणी-वरून जाणाऱ्या पायवाटेवर रान फुलाचे नाजूक अन् रंगीबेरंगी झुबके सारखे डुलत होते.

हळू हळू आह्मी ते रम्य सौंदर्य मनात साठवीत खालीं उतरलो.

समोरच एक मोठी विस्तृत दरी लांबवर पसरली होती; आणि तिच्यातूनच धबधब्याला जाणारी वाट बरीच नागमोडी वळणं घेऊन शेवटीं अदृष्य झाली होती. खाली पृष्ठभागावर मोठ मोठाल्या सपाट शिला पसरल्या होत्या व त्यातून मधून मधून शुभ्र पण फेसाळलेलं पाणी झुळझुळत होत. काहींनीं तेवढ्यात पत्त्याचे चार डाव मारलेत व उरणाऱ्यापैकीं आह्मी काहीं जण पुढे निघालो.

थोड्याच वेळात धबधब्याचा खळखळाट कानी पडू लागला; व नंतर बऱ्याच उंची वरून खालीं अडखळत उडी घेणारा त्याचा पांढराशुभ्र झोतहि दृष्टीस पडला.

अगदी खालीं धबधब्याजवळ एक मोठा थोरला डोह पसरला होता. धबधब्याची उंची बरीच होती; पण पडणार पाणी त्या मानानं थोडं असून खालीं पडे पावेतों त्याचे असंख्य फवारे होत.

यावेळीं सूर्याचीं कोवळी कोवळीं किरणं झाडाझुडुपांतून निसटून त्या साऱ्या तुषारांवरून नाचत होतीं; आणि ते सारे तुषार इंद्रधनुष्याच्या साजशृंगाराला बरोबर घेऊन खालीं पुढे आलेल्या एका खडकावर झेप घेत होते. अन् मग रंगारंगाचें कारंजे पुन्हां

खडकावरून उडी घेत बिंदूरुपानं खालच्या प्रचंड डोहांत विलीन होऊन जाई !

त्या नितात सुंदर देखाव्यावर कितीतरी वेळ साऱ्यांचे डोळे स्थिर झाले होते. क्षणभर साऱ्यानाच जगाचा पूर्ण विसर पडला होता. इतक्या लाबवर घरदार सोडून आल्याचं अगदी सार्थक झालंसं सर्वांना वाटत होतं !

पण अरेरे ! विधिघटना किती निराळी होती !!

अत्यंत आनंदमय सहलीचा शेवट अपरिमित दुःखांतच व्हायचा होता कीं काय न कळे !

मला तेच सागायचंय् पण अंगावर कसा काटा उभा राहतो ते सारं आठवल की !

३.

अकराचा सुमार असेल. सारखं वण् वण् फिरून पायांना थकवा आला होता. सारं अंग कसं जड झाल होतं; आणि वरून उन्हाच्या झळा सारख्या चटके देत होत्या. त्यातच पोटांत भुकेच्या असह्य वेदना होत होत्या. त्यामुळे मंडळींपैकीं काहीं वर टेकडीकडे पोटाचा समाचार घ्यायला वळली; व बाकीच्यांनीं समोरच्या त्या विशाल, थंडगार जलाशयांत थोड डुबून नंतर जायचं ठरविलं. मग प्रत्येक जण आपापल्या इच्छित तयारीला लागला. कोणाचं कोणाला भान नव्हतं; जो तो आपल्यातच दंग ! मी उठलो; कपडे काढून फेकले; आणि पाण्यांत उडी घेतली. पोहणाऱ्या आह्मावर मास्तरांची पूर्ण नजर होती. अशा वेळीं ‘ जया ’ ची मला एका एकीं आठवण झाली. पण गडबडींत जवळपास तो मला कांहीं दिसला नाहीं.

वाटलं, त्याला — चागलसं कांहीं पोहता येत नाहीं ह्मणून गेला असेल इतरांबरोबर वर; अन् तेवढ्यांत मास्तरांनीं लवकर वर येण्यास इशारा केल्यामुळें आम्ही पाण्याबाहेर पडलो; त्या विचाराची गति तेवढ्यावरच थाबली. कपडे बदलून अन् ओले पिळून, एक एक, दोन दोन, जसं ज्याचं होईल तसा तो वर निघाला.

सर्व मंडळी एकत्रित झाल्यावर दुसरा काहींच विचार न करतां प्रथम साऱ्यानीं आपापले फराळाचे डबे रिकामे करण्यास सुरुवात केली; व मग नेहमींच्या ठराविक ' ग्रूप ' प्रमाणं जे ते सहभोजनास बसले.

मीं सभोवार नजर टाकली; जया कांहीं दिसेना. तो माझ्या आधीं वर आला असला तरी माझ्या शिवाय त्यानं कांहीं खाल्लं असेल हें शक्यच नव्हतं. तो स्वभावानं जात्याच अत्यंत मोकळा, थट्टा विनोदाशिवाय घटकापळ निघायचं नाहीं, त्यामुळं साहजीकच त्याची सर्वांत चर्चा होऊं लागली. मीं चौकशी केली तों पहिल्या मंडळीं बरोबर कांहीं तो नव्हता. त्याना वाटलं होतं, " राहिला असेल मागे, येईल मग साऱ्याबरोबर. " पण आमच्या बरोबरहि तो नव्हता हें कळल्यावर जो तो विस्मित झाला. मी तडक उठलो; मंडळीहि उठलीं. टेकडीवर चारी दिशांना त्याला पाहिलं; आवाज दिले पण ' ओ ' येईना तेव्हां तो वर असेल असं वाटेना. आह्मां साऱ्यांना वर येऊन एक दीड तास झाला असेल; अन् दुसरं, त्याचे शिवाय दुसरा कोणीच खालीं राहिलेला दिसेना. मग मात्र सर्वांना काळजी वाटूं लागली.

अशा मनःस्थितींत त्याला पहाण्याकरिता सारी मंडळी पुन्हा धबधब्याकडे निघालीं. का कोण जाणे, धबधब्याचा तोच स्वर माझ्या कानांना या वेळीं भेसूर वाटूं लागला. अन् मग त्याबरोबर छाती देखील धड्धड करूं लागली.

अगदीं कुंडाजवळ आह्मी येऊन पोहोचलो, तरीहि कोणी दिसेना, साराच शुकशुकाट !

इतक्यांत एकाला जरा दूरवर, एका शिळेवर कपड्यांसारखं काहीं दृष्टीस पडलं !

काय आश्चर्य ! ते सारे ' जया ' चेच होते ! !

मग हा असा गेला तरी कुठं ' —

— कित्येकाचे मुखावाटे शब्दोच्चार बाहेर पडले. मग कित्येकांनीं घसा कोरडा होईतो त्याला आवाज दिलेत; शिट्या वाजविल्या; पण शेवटीं त्यांच्या कुत्सित व भयाण प्रतिध्वनीशिवाय कोणीच परत फिरलं नाहीं !

मग मात्र आपापल्या परीं जो तो घाबरला. कित्येकांनीं पाण्यांत उड्या घेण्याची तयारी केली. पण मास्तरानीं तसं कोणालाच करूं दिलं नाहीं. मात्र शाळेचा गडी व ते स्वतः पाण्यांत शिरले. साऱ्यांचा जीव या वेळीं डोळ्यात एकवटून दृष्टी त्या दोघांवर खिळली होती.

शेवटीं तास दीड तासातहि कांहींच न आढळल्यामुळे त्यांना तसंच पाण्याबाहेर यावं लागलं.

माझ्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले ! त्याची गोजीरवाणी हंसत मुख मूर्ति डोळ्यांपुढे फिरूं लागली. मी वेड्यासारखा सैरावैरा पहात

फिरलों; अन् शेवटीं मास्तरांच्या पुढ जाऊन मुकाट्यानं उभा राहिलो. तोंडांतून कांहींच शब्द फुटेना. ‘ जया ’ वर त्याचंहि अलोट प्रेम होतं. तशांत जबाबदारीमुळें त्याचा जीव दडपून गेला होता. आंतून ते अगदी घाबरून गेले असावेत.

इतक्यात एक लहान मुलगा त्याचे जवळ आला आणि सांगू लागला— “ सर, आपण वर जात होतो ना, तेव्हा ‘ जयवंत जोशी ’ मला ह्मणाला होता कांहींसं कीं— ‘ मी देखील थोडं पोहून साऱ्यांना थक्क करून सोडतो ”— व इतक ह्मणून तो त्या वाटेनं निघून देखील गेला ”

एक नवीन धागा मिळाल्यासारखं झालं.

पुन्हा मंडळींनीं सारं रान तुडविल, दऱ्या खोऱ्या पालथ्या घातल्या; पण अखेरीस सारच निष्फळ ठरल !

शेवटीं तिनाच्या गाडीने लहान मुलांना घेऊन आमचे प्रधान मास्तर मोठ्या कष्टाने परत फिरले.

वेडी आशा !

आह्मी उरलेलीं मोठीं मुलं व मास्तर पुन्हा कांहीं माग लागतो कीं काय ह्मणून निघालो.

सकाळपासून अविश्रांत श्रम, पोट रिकामं; अन् क्षणाक्षणाला वाढणारी तीव्र निराशा. सारं शरीर निर्जीव होऊन जीव खोल खोल चालला; पण मंत्रमुग्धाप्रमाणें जो तो पायांना कुठं तरी, नी कशी तरी, गति देत होता.

पण असं किती वेळ चालणार !

सूर्य बराच खालीं झुकला होता. वर आकाशांत ढगांची

सारखी येरझार सुरू होती. आणि खाली कुंडाजवळील खडकावरून आह्मी सारे निस्तब्ध पुतळ्यासारखे अंग टाकून बसलो होतो.

सकाळपेक्षाहि भयानक शांतता ह्या वेळीं पसरली होती. मात्र कोणाच्या मनात कसं वादळ उठत होतं देव जाणे !

एक जण हळूंच उठला. जरा अंतरावर गेला. कुंडाच्या मागल्या अंगास लागूनच एक मोठं थोरल झाड उभं होतं, त्यावर चढला; अन् सभोवतालच्या आसमंतांतून, जलपृष्ठावरून त्याने आपली विगलित झालेली दृष्टी सावकाश फिरविली. मूक चित्राप्रमाणे त्या साऱ्या हालचाली आमच्या दृष्टीपुढें घडत होत्या.

इतक्यात हळूच उच्चारलेले त्याच्या तोंडचे अस्पष्ट शब्द कानावर आले, हाताने खूण करून तो आह्माला बोलावीत होता. त्याने कुंडाच्या एका काठावर दृष्टी ठेवून बोटानें आह्मांला तिकडे जाण्यास सांगितले.

मावळत्या सूर्यप्रकाशात काठाशींच काही तरी पांढरेशुभ्र चमकत होते. ते काय ते चाचपडून पहाण्यास कोणाचंच धैर्य होईना. शेवटीं मनाचा धडा करून, डोळे किंचित् मिटलेसे करून आमच्या मास्तरानीं पाण्यात पाऊल रोवलं व दोन्ही हातांनीं तो कपडा— नव्हे पाण्याच्या पृष्ठभागावर आलेलं ‘ जया ’ चं धोतर· ····

हाय हाय ! कोण भयंकर दृश्य होतं तें !

मी तर हाय खाऊन मटकन् खालींच बसलो ! कुंडाच्या काठाशींच पोहण्याकरितां झेप घेणारा ‘ जया ’ चिखलांत पार रुतून गेला होता ! तळाशीं गेलेलं त्याचं तोंडहि चिखलानं माखून बंद झालं होतं !!

बिचाऱ्यानं वर यायला कोण धडपड केली असेल ! पण ते सारंच व्यर्थ जाऊन तो अधिकच खोलात रुतला गेला !

ते भयंकर दृश्य पाहून कोणास काय वाटलं असेल ! मास्तराचे मुखातून निघणारा अस्फुट आर्तस्वर माझे कानावर पडला मात्र ! मी बेशुद्ध झालो · ·· ··· पुढ कसं काय झालं कसं सागू ?

४.

मला एकदम जाग आल्यासारख झाल. आह्मी गाडींत बसलो होतो. ती स्वैरगतीन धावत होती.

बाहेर दाट काळोख पसरला होता; आणि त्या पेक्षांहि भयंकर प्रेतकळा प्रत्येकाचे चेहऱ्यावर आली होती !

आमच्या गावचं स्टेशन आलं. गाडी थाबली; पुन्हा जाण्याची कर्कश शीळहि तिनें दिली. पण कोणाचं पाऊल डब्याबाहेर पडेचना. ओळखीची किती तरी मंडळी समोर जमली होती. पण एकाचेहि चेहऱ्यावर टवटवी नव्हती. आतल्या मंडळींच्या मूक भावावरून जो तो जें समजावयाचें तें समजला !

माझ्या डोळ्यांत एकदम पूर उसळून आला ! हृदयांत कालवाकालव सुरूं झाली; जीव खोल खोल जाऊं लागला.

सकाळीं केव्हढया आनंदानं, केवढ्या उत्साहानं आह्मी दोघांनीं गाडींत पाऊल ठेवलं होत !

अन्‌·······आतां मी अस्सा एकटाच···· !!

देवा, काय झालं हें !!!

# जुन्याबाजारांतील गोड मेवा !

**तुम्ही नसलां तरी अगदीं तुमच्यांतलाच हा**
**एक मजेदार प्राणी !**
**जातीनं विद्यार्थी, पण मनानं... ?**

आठवड्याच्या बाजारांत जुनीं पुस्तकं हुडकून आवडीचीं नि सुंदर पुस्तकं आणा-दोन आण्यांना मिळविण्याची मला मोठी हौस. कधीं कधीं मोठा मजेदार सौदा हातीं येई.

एकदां असाच मी जुन्या पुस्तकाचे ढीग चाळत असता अचानक चिरखाडलेलीं व धुळीनं बरबटलेलीं कांहीं पातडीं ( कागदाचे कपटे ) एका निवडून काढलेल्या पुस्तकांत मला आढळलीं. ती सहज चाळून पहातां इतकीं गमतीची वाटलीं कीं मूळ पुस्तकाबद्दल विशेष वासावीस न करिता मिळालं ते पदरीं पाडून मीं तडक घराची वाट धरली.

—तीं कोणातरी 'उडाणटप्पू' विद्यार्थ्याच्या डायरींतील चार दोन पानं होतीं. लिहितांना महाशयांना कांहीं 'तशी' जाणीव नसावी. पण मला मात्र तें सारं वाचल्यावर जसं वाटायला लागलं तसं साऱ्यांनाच वाटेल अशी माझी आपली खात्री !

कधीं कधी माणसाच्या अंगी दुर्गुणाबरोबर एखादा विलक्षण गुणहि चिकटलेला आढळतो ना, तशातलाच येथे प्रकार; कारण 'असल्या' राजश्रींना लिहिण्याची इतकी झोकदार संवय असणं ह्मणजे नवलच ह्मणायचं. पण काहीं असो, माझ्याबरोबर तुमची देखील जरा करमणूक व्हावी ह्मणून देतो तुह्माला हे वाचायला. मग वाटलं तर ते सारं वाचल्यावर द्या 'श्रीयुताना' दुसरं सुचेल ते नाव — तुमच्या अगदीं आवडीचं अस्सं.

पण जर का चुकून तुमच्याचपैकीं कोणाची तरी विस्कळलेली पानं माझ्या हातीं पडली असतील, तर त्यानं आणून दाखवावी आपली डायरी मला, तिच्यात बसलीच ही "फिट्" तर देईन परत करून.

*　　　*　　　*

मंगळवार. तारीख २४-१०-३०

**कोण** हा जजाळ आह्मा विद्यार्थ्यावर! नको तो अभ्यास; अन् नको तो परिक्षांचा ससेमिरा! आणखी पंधरा दिवसानीं दिवाळी! पण त्यापूर्वी ह्या 'टर्मिनलचा' ससेमिरा लागलेलाच हात धुऊन पाठीशीं. तिकडे पुढारलेल्या राष्ट्रात ह्मणे ह्या परीक्षा अन् हीं बक्षिसं सारींच आह्मा विद्याभक्तापासून अलिप्त! मग इकडेच हा गोंधळ माजवण्याचं काय अडलं होतं? का ते लोक अडाणी, का मूर्ख, का · पण हा अस्सा कितीहि विचार करून डोकं पिकवून घेतलं तरी ही परिक्षाची ब्याद हातावेगळी करून टाकता का येणार आहे!

आतां हे खरं की हे परिक्षाचं अन् ' स्कॉलरशिप्स् ' — बक्षिसाचं लोढणं डोक्यावर नित्य वहायची ज्याना खोडच जडली असेल, त्यांना मात्र असला प्रसंग पंढरपूरची यात्रा करण्यापेक्षाहि परमपवित्र, अन् प्रत्यक्ष दिवाळीपेक्षाहि अधिक आनंदाचा! पण असले पढत मूर्ख साऱ्या शाळेत कितीसे असतील? चार, सहा, — जास्तच झालं तर — दहा! **पण मीं ह्मणतों,** ' मेजॉरिटी ' कोणाची? · ··· बरं, दुसरं, इतका अभ्यास करून अन् हाडाची काडं करून कोणाचं भलं का व्हायचंय? आताचा हा काळ धामधुमीचा, धकाधकीचा! शेळपटपणाचा नव्हे! दुसरं, इतकी धडपड करून, मोठ्ठ नांव मिळवून, पुढ काय दिवे लागणार ते दिसतंच आहे! आजच्या एखाद्या बड्या ऑफिसरला नाव अन् पैसा ह्या दोन्हीहि क्षेत्रात एखादा बरासा नट किंवा नटी सहज मागं टाकील. हो, पण आजचा, जगाकडे पहायचा दृष्टिकोन मात्र जरा व्यावहारिकच हवा; पण जाऊं द्या. · ·····उद्याचं ' इंग्लिश टेक्स्ट ' कसं तरी रात्रींतून रटलं पाहिजे ' की ' वरून. पण अरेरे! तींच नेली त्या जोगळेकरानं काल, अन् नेताना राजश्रींची मुक्ताफळं — ऐकलींत का, " अरे, तूं तर वर्गाचा जहागीरदार, लॉर्ड, गेल्या चार वर्षांपासून; अन् त्यातून ही पडली ' टर्मिनल ' दे झालं पुस्तक ···· " काय मजा पहा! गेल्या क्वार्टरलीला त्याच्या गणिताच्या पेपरची मीं केली उगीच थोडी कॉपी; अन् हेड मास्तराना न सागता हा चुप बसला ह्मणूनच याची आज ही अशी सारी मिरासदारी! काय, करायचं काय? **पण मीं ह्मणतों,** हे लेकांचे ' मेरिट स्कॉलरशिप होल्डर्स; ' मग ह्यांना साऱ्या उसनवारीची कां गरज पडावी?

हो, पण मी अगदींच कसा विसरलो ? ती ' की ' गेली तर गेली. मीं एक कशी सवाई युक्ती काढलीय शोधून ! जर साधलं तर या साऱ्यांना लावतां येईल चणे चुरमुरे चारायला. मग मात्र ह्मणावं, बसा अस्सेच रडत त्या ' की 'ज् नाहींतर त्यांचे जुडगे घेऊन !

—त्याचं असं झालं. काल शाळेच्या ऑफिस रूममध्यें दयाराम दप्तरी अन् भावे मास्तर ' सायक्लोस्टाईल ' वर परिक्षेचे पेपर्स काढीत होते. मी मात्र बाहेर सारखा घोटाळत होतों. आधी-पासूनच हवं तें हेरून ठेवलं होतं. कांहीं वेळानं त्या खोलीच्या किंचित् उघडलेल्या खिडकींतून शाईनं बरबटलेला दयारामाचा हात बाहेर आला, अन् लगेच उद्यांच्या पेपरचा एक, उगीच थोडा फाट-लेला काळाकुट्ट कागद, खिडकीबाहेर झोंकला गेला; त्याचं रूपांतर फेकण्यापूर्वीं चिध्यांत होऊं नये ह्मणून दयारामाच्या हातात आधींच ' चिरीमिरी ' कोंबून दिली होती ह्मणून बरं झालं, नाहीं तर हे लेकाचे, अगदींच अडाणी !……मग आता काढावा तो कागद बाहेर अन् दिव्यापुढं धरून सोडवावं हें सारं कृष्ण कारस्थान, उद्यांकरितां !

२.

सोमवार तारीख २०-११-३९

योगायोग ! दुसरं काय ? दिवाळीच्या अगोदरच आमचा लागायचा रिझल्ट. पण सुदैवानं भावे हेडमास्तरांचे कोणी नातेवाईक ' सीरियस ' ह्मणून आली तार; अन् ते गेले निघून. मग रिझल्टचं

साहजीकच पडलं लावणीवर. बरं झालं; त्यामुळें ही दिवाळी तरी पडली पदरीं········

हे सुट्टीचे दिवस कसे गेले पण अगदीं भुरऽऽ कन् निघून! ह्मणतातच– " सुख पाहतां जवां पाडें, दुःख पर्वता एवढे "— दिवाळीच्या ह्या दहाबारा दिवसांच्या आनंदावर परवांच्या ' रिझल्ट डे ' नं कशी सारी घाण करून टाकली!

···खरं ह्मटलं तर परवां मी हजरच रहायला नको होतं शाळेत. हो, " दृष्टीआड सृष्टी! " इतकं कांहीं वाटलं नसतं, मग! पण हें माहीत होतं कोणा लेकाला कीं, नेमका त्याच दिवशीं लागायचा रिझल्ट? ह्मटलं, नुकतीच शाळा सुरू झालीय. लागेल तो आतां पुढच्या आठवड्यांत. पण जगात अनुमानाप्रमाणं सारंच घडलं तर ' नशीब ' ही चीज उरणार कशी!

···· ' इंग्लिश टेक्स्ट् ' मध्ये तर उडलो कसा तरी ह्मणा, पण तें शिंच ' ग्रामर ' अन् ' अन्सीन, ' जें पाहिलं नाहीं, ऐकलं नाहीं, शिकवल नाहीं ते विचारायची खोडच यांना! हा निव्वळ जुलुम नाहीं का? — ह्यानीं नेहमीं प्रमाणेच दगा दिला शेवटीं. उरलं, ट्रान्स्लेशन! त्याचा म्हणायचा – ' पीस ' अन् छापून द्यायचं – लांबच लांब चऱ्हाट. ही मराठीची इंग्रजींतील ओढाताण आपणांला तर अगदीं नाहीं बुवा पसंत!

···· गणिताला तर मीं जाणून बुजून केलीच नव्हती सुरुवात ' ह्या टर्मिनल ' करितां. या वेळीं मागच्या चार वर्षांचा अनुभव आला माझ्या कामीं ह्या आकड्यांच्या कवाइतीला डोकं कस कोर करकरीत अन् ताजं तवानं पाहिजे; तेव्हां ह्मटलं तें वार्षिक परीक्षे-

करितां ठेवायलाच हवं. उगीच आधीं पासून त्यात नसता गोंधळ नको !....

... एरव्हीं मी मराठींत – मातृभाषाच ती ! – का कोणाला हार जाणारा ? पण पहा, एकेकाच नशीब कसं असतं ते ! यंदा पासूनच बोर्डांत नवीन शुद्ध लेखनाचं खूळ सुरू झालं, त्याची झळ आमच्या आठवीलाहि लागलीच. आता इतके दिवस अगदीं घोकून वळवून, बिनचूक लिहिण्याची संवय केली ती का एकदम जाणार ? ... पण जाऊं द्या; एकेक विषयाचं रडगाणं मी गात बसलो तर बिचाऱ्या ह्या डायरीची किती पान वळी पडतील कुणास ठाऊक ? थोडक्यांत — मी नापास झालों, अगदी गोल्डन क्रॉस मिळाला मला – पण त्या करिता माझं ह्मणणं ऐकतो कोण ! एखाद्यानं केलेले श्रम ते कितीहि असोत , – जग थोडेच पहाणार निव्वळ निकालावरून दिवे ओवाळावयाची त्याची खोड !

परवाच गणिताचे मास्तर भेटले होते वाटतं तात्याना रस्त्यात. आमचे तात्या ह्मणजे काय, अगदीं जमदग्नीचा अवतार ! घरीं येतांच त्यांच्या त्या विस्फारलेल्या नाकपुड्या, लालबुद डोळे, वळलेल्या मुठी अन् संतापलेल्या मुखांतून सुटणारे वाग्बाण – इतक सारं संग्राम साहित्य ( मला नव नाहीं ह्मणा )— माझ्या नजरेस पडलं; वाटलं आता कांहीं धडगत नाहीं आपली. पण त्याचवेळीं माझ्या सुपिक डोक्यांतून, पारिजातकाच्या फुलाप्रमाणे, एक युक्ती टपकलीच ! मी धाडकन दिलं अंग टाकून जमिनीवर. अन् मग काय ? कोण धांवाधाव ! मले त्या बेशुद्धावस्थेनच (?) बिछान्यावर —

निजविण्यात आलं; अन् डॉक्टरानीं देखील सागून दिलं " हा मेदूचा विकार कशाचा तरी शॉक बसून उद्भवलाय. " तेव्हा पासून आज दोन दिवसात तात्यानीं माझ्याकडे नुसतं डोळे रोखून देखील पाहिलं नव्हतं. आता ओल्याबरोबर थोडं सुकहि जळतं कधी कधीं. वेळ बचावली, पण एक दीड दिवसाच फुकट लंघन मात्र करावं लागलं. पण त्याला इलाज नव्हता. पण जाऊं द्या आता त्या गोष्टी कशाला उगीच

**पण मी ह्मणतों**– का जाऊ द्या ? मन मोकळ करायला दुसरं कोण आहे मला ?

तसं ह्मटल तर मी काही सर्वांत वडील नाहीं तात्याचा. माधव अन् दिनू माझ्याहून मोठेच; त्याच्यावर हव्यातर त्यानीं लादाव्या आपल्या साऱ्या इच्छा, आकांक्षा. नाही कोण ह्मणतो ? एखाद्याला जरा जाऊं दिलं आपल्या स्वतंत्र बुद्धीनं, तर गेलं काय याचं मोठंसं ? घरीदारीं, सारीच पहा, अरेरावी ! **मी ह्मणतों** शाळेला द्यायची उपमा ' कोडवाड्याची ' तर मग ह्या ' असल्या गृह-मदिरांना ' ?

जाऊं द्या. कोळसा उगाळावा तितका काळाच. मी असा भावनावश झालो ह्मणजे काय लिहूं किती लिहूं असं होऊन जातं.

ह्या बिचाऱ्या डायरीचं अन् लेखणीचं– चुकलों, फाउंटन-पेनचं– मरण मग !

पण जाता जातां एक गोष्ट लिहिल्याशिवाय कांहीं राहवत नाही मला. आमच्या तात्यांचा स्वभाव असा खट् असला तरी आमची

आई मात्र त्यांच्या अगदीच उलट! उगीचच का बिचारीनं उभा संसार केला त्यांच्याशीं ?—

परिक्षेचा रिझल्ट लागला तो परवाचा दिवस. मी नापास झालों. वाईट वाटलं मला!– हो पास होऊं नये असं कोणाला वाटतं ?– मी आलों तसा हळूंच खोलींत जाऊन दार घेतलं लोटून, अन् पसरलो जरा अस्साच. ते आलं वाटतं आमच्या आईसाहेबांच्या लक्षांत (तिला हा प्रकार काहीं अपरिचित नाहीं ह्मणा!)– —शेजारच्या मुलांना पास झाल्याबद्दल गोड धोड करून दिलं होतं त्यांच्या घरीं. मी नापास झाल्यामुळे मला कुठून मिळायला बसलं कांहीं तसलं! पण मला वाटतं जगांत पुरुष जात सारीच निष्ठूर, तर साऱ्याच स्त्रिया अगदीं लोण्याहून मऊ! आइनं तात्यांची नजर चुकवून हळूंच माझ्या हातावर शिऱ्याचा एक घास ठेवलाच!

३.

मंगळवार ता. २-१-४०

किती, किती आनंदाचा प्रसंग हा! असं कांहीं घडलं ह्मणजे लिहितांना लेखणी कशी फुरफुरते अगदीं!

कालच झालं आमच्या शाळेचं गॅदरिंग मोठ्या थाटांत, अहाहा! जेवणाचा बेत पण बेत! जिलबीची नळी कशी ठसठशीत अन् रसदार बरं का! भजीं कशी खुसखुशीत; कोबीभात कोण खुमासदार; अन् बेटी पातळ भाजी देखील पण कशी लज्जतदार! कृष्णप्यानं अगदीं बहार उडवून दिली होती! आधींच पदार्थ असे नमकीन, तशात थोडी चढवून दिली होती 'हिरवी'; मग काय! असा कांहीं हात मारलाय् ह्मणतां एकेकावर, कीं दुपारीं तब्बल

चारपाच तासाची निश्चिंती ब्रिज्, कॅरम, गाणं बजावणं ह्यांच्या ऐन-धामधुमींत हंसण्या खिदळण्यात आमच्या सारख्याच्या स्वाऱ्या डाराडूर घोरताना पाहून कित्येकाना कोण आश्चर्य वाटलं! **पण मीं ह्मणतों** त्या बैठ्या गोष्टीपेक्षा हे बर की नाही? नसता छद अन् वितंडवाद नको वाढायला.

पण मी हे सारं कशाला लिहीत बसलो आहे उगीच! संध्याकाळीं स्पोर्ट्स् झाले, कापिटिशन्स (विचित्र पोषाखाच्या) झाल्याच, साऽऽरं झालं पण मुख्य प्रोग्रॅम होता रात्री साडे आठाला. शाळेच रिपोर्ट वाचन व्हायच होत आणि त्या आधीं 'एकच प्याल्याचा' दणदणीत प्रोग्रॅम व्हायचा होता त्याकरिता शाळाखात्याचे अधिकारी व पालकवर्ग निमंत्रित केला होता.

सुमारे सव्वा आठपासूनच मंडळींनीं हॉल फुलून गेला.

इकडे आत स्टेजवर आमची कोण धादल! मी अभ्यासांत कसाहि असलो, खेळात माझ मन अगदी रमत नसल, तरी ह्या कामीं मात्र मी सगळ्यात पुढे! आधींच दिसण्यात मी जरा देखणा, अन् चारचौघापुढं बोलताना मुळीच न भिणारा. माझ्यावर तर आज शाळेची सारीच मदार! गडकऱ्यानी आपल्या लेखणीच्या फटकाऱ्यात 'सुधाकरा' चं पात्र जितकं जोरदार रंगवल त्या पेक्षाहि माझं काम अधिक दणदणीत वठल.

नाटक संपलं; टाळ्याचा कडकडाट झाला. स्वत: डायरेक्टर साहेबानीं माझेवर स्तुति–सुमनाचा वर्षाव करून एक पदक बहाल केल्याचं जाहीर केलं. पुन्हा एकदा सारा हॉल टाळ्यानीं हादरला. जो तो विचारूं लागला "काहो, हा 'सुधाकर' कोण बरं?"

अन् मग साऱ्याच्याच स्तुतीचा मी विषय झालो· ·पालकांच्या रांगेत तात्या बसले होते. मीं त्याच्याकडे हळूंच पडद्याआडून पाहिलं; ते देखील आनंदून गेले असावेत. माझा तो मानसन्मान पाहून क्षणभर मलाहि आपलं वाटलं— नाहीं परीक्षेचा तर नाहीं, पण त्यापेक्षां दसपट मान मरातब, अन् आनंद मीं आज बहाल केला होता त्याना !

मंडळी गेल्या वर स्वत. हेडमास्तरानीं माझी पाठ थोपटली. अन् रात्रीं घरीं गेल्यावर आईनं तर दृष्टच काढली. पण एरव्हींचे ‘ जमदग्नी तात्या ’ त्यानीं देखील गाळले दोन आनंदाश्रु ·!

त्या कालच्या प्रकारान माझ्या मनात एक गोष्ट मात्र चमकून गेली. हें अभ्यासाचं सारं लोढणं द्यावं टाकून, अन् जावं एखाद्या ‘ टॉकीज् ’ मध्यें. आजकाल ह्या ‘ टॉकीज ’ चं स्टेज सुशिक्षित मंडळींनीं कसं दणाणून सोडलं आहे. कोण तो मान ! काय मरातब ! अन् पैसा तरी किती चिक्कार ! कालच्या ‘ लपंडावात ’ ह्मणे ‘ मीनाक्षीला ’ पाच हजार रुपये पगार पडला. अन् ह्मणूनच ह्मणतो, आजच्या जगात ज्याला पैसा अन् बाकी सगळं काहीं हवं असेल त्यानं सरळ उठावं अन् ह्या कंपन्यांत शिरावं, अन् आपलं कौशल्य जगाला दाखवून थक्क करून सोडावं. त्या आनंदानं बेहोष झालेला एखादा प्रेक्षक मग काहीं विचारीत बसणार नाहीं. —“ ह्यानं शाळेचं कोणतं दालन ओलांडून कोणती पदवी मिळविली ”, तें !

पण मी किती वहावत चाललों ! आमचे साऱ्या मुलुखांतील खाष्ट तात्या मला असं करायला देतील का परवानगी ? अगदींच

ऑर्थोडॉक्स! काल थेोडं वाटलं असेल बर त्यांना, आपलं काम पाहून; पण ह्मणून त्या कंपन्याचं नाव काढलं कीं · ···

····**पण मी ह्मणतों**— त्याच्या जवळ काढून पहावीच एकदा ही गोष्ट ते जरा खुषींत असतीलस पाहून. सरळ ऐकलं तर ठीक; नाहीं तर एक विचार ठरवून टाकावा—

—'टर्मिनल' प्रमाणेच ही 'फायनल' हि अगदीं कोरी जाऊं दिली कीं नेहमींप्रमाणे ते सतापतील आधीं एक दोन दिवस; अन् शेवटीं ह्मणतील तिसऱ्या दिवशीं —

"जा, नाचा, तुह्माला हवं तसं!"

**पण मी ह्मणतों** आज कालच्या आह्मा तरूणांना ह्याशिवाय दुसरा कोणता होकार ·· !"

पण येथें डायरीचं पान संपून माझ्याजवळच भाडार देखील सपलं होतं. जें काहीं वाचायला मिळाल त्याचा आनंद व्हायच्या ऐवजीं बाकीचं मिळालं नाहीं ह्मणून मात्र मनाला विलक्षण चुटपुट लागून राहिली!

समाप्त

# ह्या पुस्तकावरील कांहीं निवडक अभिप्राय—

**राय रतन केशव भास्कर कोचरेकर,** बी. ए,

हेडमास्तर, म. शि. म मि. स्कूल इंदूर,—

**बालशिक्षणाचे अभ्यस्त विद्वान यांचा अभिप्राय—**

——0——

श्री वैद्य यानी लिहिलेल्या 'सवगडी' या पुस्तकाचे हस्तलिखित मी वाचले व ते मला आवडले सरासरी १३ ते १६ वर्षे वयाच्या मुलाकरिता त्यानी ते लिहिले आहे या वयात मुलाची दृष्टि अद्भुत व काल्पनिक जगाकडून प्रत्यक्ष जगाकडे वळलेला असते शालेय जगातील त्याचे सवगडी, त्याचे अनुभव व कृति या त्याना जितक्या आवडतात तितक्या हिडिंब-बकासुरादिकाच्या अचाट कृति आवडत नाहीत, व उद्बोधकहि होत नाहीत रा वैद्य यानी या वयातील मुलाच्या जीवनातील प्रसंग निवडून त्याना सुंदर रीतीने चित्रिले आहे मुलाना हे पुस्तक आवडेल, इतकेच नव्हे तर ते त्याच्या बुद्धि व भावना याच्या विकासास मदत करील

या वयातील मुलाना रुचेल व पचेल असे वाङ्मय अद्याप मराठीत फारसे नाही रा वैद्य याचा उपक्रम उत्तेजनार्ह आहे व यापुढे या वयातील मुलाकरिता पुस्तके लिहून वाङ्मयात ते भर घालतील अशी मला उमेद आहे

ता ५—५—४१

---

कादंबरीची खुमारी, गद्यकाव्याची छटा, स्वत च्या आयुष्यातील काहीं प्रसंगाची आठवण व लघुकथाची थोडक्यात तहान कोणास घटका भरातच भागवावयाची असेल, तर त्यानी हे चुटके अवश्य वाचावेत

ता. २३–१–४१ प्रो. **ना. कृ. ओक** एम्. ए.

## श्री. रा. रा. वि. रा. राजवाडे

एम्. ए., एल्. टी., विशारद

**हेडमास्तर सरकारी मराठी हायस्कूल-अमरावती.**

" ' 'सवगडी ' हे आपल्या पुस्तकाचे नाव अगदी यथार्थ आहे. ज्या वयाच्या विद्यार्थ्यांकरिता ते लिहिले आहे, त्यावेळी त्याना आपल्यापेक्षा थोडे अधिक ज्ञान व अनुभव असलेल्या सवगड्याचीच अत्यंत जरुरी असते. व ती आपल्या पुस्तकाने चागली भागेल असे वाटते पाचकळ आणि एकाच ठशाच्या लघुकथा आणि बोलपट कथानके याच्याशी निकटचा सबंध आल्यामुळे आजकालच्या विद्यार्थ्यांची अभिरुची वाईट दिशेकडे झुकत आहे तिला योग्य मार्गावर आणून इतरही काही चागले वाचण्यासारखे असते व आहे ही गोष्ट '**सवंगडी**' त्याना सागितल्याशिवाय रहाणार नाही

अशाप्रकारचा आरोग्यदायक खुराक आपल्या भावडाना पुरविल्याबद्दल आपले अभिनंदन करावे तेवढे थोडेच आहे "

## श्री. रा. रा. विनायक सीताराम सरवटे,

बी. ए. एल.एल. बी.

**अध्यक्ष, महाराष्ट्र साहित्य सभा, इंदूर,**

**व 'आईबापास चार शद्व', 'सामाजिक वाद' आणि इंदूर सम्मेलनाने स्मारक ग्रथ ह्मणून प्रसिद्ध केलेल्या 'मराठी साहित्य समालोचन' इ० चे कर्ते-याचा अभिप्राय—**

बारा ते अठरा वर्षे वयाच्या बाल वाचकाच्या भेटीस येणारा हा 'सवंगडी' त्याना **करमणुकीबरोबर ज्ञान प्राप्त करून देईल**; आणि चांगल्या कार्याचें प्रोत्साहन देईल. त्याचे **बोलणें गोड** आणि **विनोदी आहे**; आणि हंसत खेळत आपल्या वाचकाना तो पुष्कळ उपयोगी माहिती करून देईल. मला आशा वाटते की समवयस्क वाचक त्याचे कौतुक करतील व त्यास उत्तेजन देतील.

ता. ७।२।४१ **वि. सी. सरवटे—**

## श्री. रा. रा. रा. वि मिराशी, एम् ए

**प्रोफेसर मॉरीस कॉलेज–नागपूर.**

" आपल्या पुस्तकातील लेख विद्यार्थ्या वाचकाची जिज्ञासा वाढवितील, अभिरुची सुधारतील व मनोरंजन करतील असेच आहेत संस्कारसुलभ अशा १२ ते १८ वर्षे वयाच्या मुलाचे ' सवंगडी ' चागले असावेत अशी पालकानी काळजी घ्यावयास पाहिजे या वयात आपल्या पुस्तकासारखी पुस्तके त्याच्या हातीं दिल्यास त्यास हुषार सद्वर्तनी व विनोदी ' सवंगडी ' मिळवून दिल्यासारखे होईल "

**रा. वि. मिराशी एम् ए**

## प्रो दत्तात्रय महादेव बोरगांवकर, एम् ए

होळकर कॉलेज, इंदूर

' शांति–स्वरूप ह्या नाटकाच कर्ते ह्याचा अभिप्राय.—

" सवंगडी " या पुस्तकाचे हस्त–लिखित वाचून फार आनद झाला. बारा ते अठरा वर्षे वयाच्या वाचकासाठी **मनरंजनाबरोबर ज्ञान प्राप्ति करून देण्याचा हा प्रयत्न स्तुत्य आहे.** पुस्तकातील लेखात बरीच विविधता असून निरनिराळ्या भावनाचा योग्य परिपोष झालेला दिसतो " आधुनिक मुलाखती " " खरा यशवन्त " " कॅमेऱ्याला बळी " वगैरे चुटके चागले साधले असून, **पुस्तकाची भाषा सरळ, सोपी व गोड आहे. शाळांतील माध्यमिक वर्गांसाठी पुस्तकाचा विशेष उपयोग होईल.**

ता. २१ फेब्रुआरी —**दत्तात्रय महादेव बोरगांवकर**

आपला सवगडी मी संपूर्ण वाचला त्याच्या सहवासात माझा वेळ बराच आनंदात गेला आपण घेतलेल्या आधुनिक मुलाखती साधारण प्रौढ विद्यार्थ्यांना माहितीपूर्ण, उपयुक्त व चटकदार वाटतील यात शंका नाही तथापि आधुनिक मुलाखतीचे स्वरूप लक्षात घेता आपल्या या मुलाखतींना आपण 'मुलाखती' म्हणण्याऐवजी आत्मचरित्रे म्हटले असते तर ते अधिक अन्वर्थक झाले असते असे मला वाटते कॅमेऱ्याला बळी, खरा यशवंत, जुन्याबाजारातील गोड मेवा इ० गोष्टीतून विद्यार्थी जीवनातील अवखळपणा आपण चांगल्या रीतीने चित्रित केला आहे आपला विनोद बाल वाचकाची करमणूक केल्या-खेरीज राहणार नाही अशा या अवखळ पण सत्प्रवृत्त सवंगड्याचे योग्य ते स्वागत विद्यार्थी वर्गाकडून अवश्य होईल अशी मला आशा वाटते

अमरावती
ता ७।६।४१

प्रो वि भि. कोलते.
एम ए एल् एल् बी

'मराठी साहित्य समालोचन' ह्या ग्रंथाचे सहायक,

श्रीयुत सीताराम नारायण गवारीकर

ह्यांचा अभिप्राय—

आनंद दुसऱ्यास सांगितल्याने दुणावतो व दुःख कमी होतें म्हणून आपल्या आनंद-दुखात समवयस्क मित्रास सहभागी करण्याचे हेतूनें 'सवंगडी' पुढें आला आहे येताना त्याने विमान, वीज, ग्रामोफोन, रेडिओ इ० कडून आत्मचरित्र वदवीत माहिती सांगितली आहे काही शब्द-चित्रें तर जुन्या-बाजारातील गोड पण रुचकर मेवा म्हणून स्वादाकरिता ठेविलीं मुळात इंग्रजीचें, करूणरसपूर्ण व भावनोद्दीपक रूपांतर सरस वठविले आहे एकंदरींत, 'सवंगड्यास' भेटणाऱ्याची त्याच्या विविध कलाकृतीनें घटका-भर करमणूक झाल्यावांचून रहाणार नाही.

इंदूर
ता. ३१-१-४१

सीताराम नारायण गवारीकर

श्री ग ना. वैद्य यांचा हा 'सवंगडी' मुलांची छान करमणूक करील. 'विमान', 'वीज', 'ग्रामोफोन' आणि 'नभोवाणी' यांच्या आरंभीं दिलेल्या मुलाखती मुलांच्या मनात हंसत खेळत चागली भर घालतील शास्त्रीय सुधारणाची माहिती देण्याची ही पद्धत चटकदार आहे. 'जुन्या बाजारांतील गोड मेवा' वाचून हायस्कुलातील विद्यार्थ्यांच्या जीवनाची चांगली कल्पना येते 'सवंगडी' तील इतरहि लेख चागले असून हायस्कुलांतील विद्यार्थ्याना हें पुस्तक आवडेल, याविषयीं मला शंका नाही

शांतानिवास, नागपूर
ता ७-६-४१

ग. त्र्यं. माडखोलकर

सवंगडी हे लहानसे पुस्तक 'विद्युज्ज्योतिसारखें चमकणारें व मनोरंजनाबरोबर वैज्ञानिक विषयावर प्रकाश पाडणारें आहे. माध्यमिक वयाच्या मुलाना करमणुकीखातर वाचूनहि ते फार उपयुक्त व ज्ञानवर्धक होईल अशी माझी खात्री आहे

ह्या पुस्तकातील अद्‌भुत रम्यता विशेष उल्लेखनीय आहेत

एकन्दरीत लेखन विनोदप्रचूर, ज्ञानबोधक व भावनोद्दीपक असल्यामुळें वाचकास अपूर्व आनद होईल, व शाळेंतील माध्यमिक वर्गाला विशेष निरोपयोगी होईल अशी माझी खात्री आहे

Palasia
Feh 3 rd 1941

C. P Shastry, M A.
Veda-kavya Teertha
Vyakaran Shastry,
Prof of skt
I C College, Indore.

**भव्य मशीनरीचें साह्यानें ब्लॉक्स आधुनिक पद्धतीनें**

झिंक व कॉफरचे

**लाईन, हाफटोन, कलर.**

फोटोग्राफ्स, जाहिराती, कॅटलॉग लेबल्स, बुककव्हर्स, मॅप्स,
सर्टिफिकेटस्, स्टोरी इलस्ट्रेशन्स, इत्यादि साठीं ब्लॉक्स
व आकर्षक डिझाइन्स केले जातात.

**आपलें कामाकरितां आम्हांसच लिहा.**

# दी वासुदेवराव स्टुडियो

**ब्लॉक मेकर्स**

३० तोफखाना मेनरोड, इन्दोर, सी. आय्.

---




# फॅमिली टूथ पावडर

**सर्व दंत रोगावर अप्रतिम आहे.**

एकदां वापरल्यास कायमचेच वापरू लागाल.

**सर्वत्र मिळते.**

तयार करणार — **फ्रेंड्स् इंडस्ट्रीज्**

जेलरोड, इन्दोर, सी. आय्.

# फाईन आर्ट स्टुडियो

सर्व तऱ्हेच्या पेंटिंगच्या कामाचे

**फक्त एकच ठिकाण**

सिनरीचे पडदे, स्टॅन्यूज्, गणपती वगैरे देवादिकांच्या सुबक मूर्ति इत्यादि गृह सौंदर्यवर्धक गोष्टींसाठी

**आमचेकडे जरूर कळवा.**

७८, खजुरी बाजार, इन्दोर, सी आय्

---

# Western Astrol gical Bureau

Conducted by—

**V. K Dangwadekar**

On the most scientific system of Astrology, in every department of life

# वेस्टर्न ऍस्ट्रॉलॉजिकल ब्यूरो

**मे हरतरह के ज्योतिष विषयक—**

जन्म-कुंडली, वर्षफल, प्रश्न, मुहूर्त, आदि काम अंग्रजी तरीकेस निहायत तसल्ली बक्शकर दिये जाते है.

प्रोप्रायटर — **व्ही. के. दंगवाडेकर,**

२२ तोफखाना-मेनरोड, इन्दोर, सी आय्

**नोट** — जन्म तारीख, महिना, अंग्रेजी सन, जन्म का टा[illegible] [illegible] जन्म-स्थान मुकाम्य हिंदी, मराठी या अंग्रेजीमे होना जरूरी है